# पुष्पा उवाच

पुष्पा जगताप

BlueRose ONE .com
Stories Matter
NewDelhi • London

**BLUEROSE PUBLISHERS**
India | U.K.

Copyright © Pushpa Jagtap 2025

All rights reserved by author. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the author. Although every precaution has been taken to verify the accuracy of the information contained herein, the publisher assumes no responsibility for any errors or omissions. No liability is assumed for damages that may result from the use of information contained within.

BlueRose Publishers takes no responsibility for any damages, losses, or liabilities that may arise from the use or misuse of the information, products, or services provided in this publication.

BlueRose ONE.com
Stories Matter
NewDelhi • London

For permissions requests or inquiries regarding this publication,
please contact:

BLUEROSE PUBLISHERS
www.BlueRoseONE.com
info@bluerosepublishers.com
+91 8882 898 898
+4407342408967

ISBN: 978-93-7139-650-9

Cover Design: Aman Sharma
Typesetting: Pooja Sharma

First Edition: August 2025

**किसी भी व्यक्ति, स्थान या समुदाय से किसी भी प्रकार की समानता, चाहे वे मौजूद हों या न हों, पूरी तरह से संयोग है और अनजाने में हुई है। इससे हुई असुविधा के लिए हम गहरा खेद प्रकट करते हैं और क्षमा चाहते हैं।**

**॥ श्री काळेश्वर प्रसन्न ॥**

**॥श्री वाकुबाई प्रसन्न ॥**

## श्रद्धांजली

पुष्पा जगताप (१९४० ते २०२४)

आई देवाच्या कृपेने तुझ्यात लेखणीचं कौशल होते, तुझ्या लेखणीने आपल्या छोट्या कुटुंबात एक वेगळाच उत्साह, आनंद व गर्व चा आभास होत असे,सुखा दुखा चया शणांनला तू शबद दिले, कलाकार कौशल्याने आणि विचाराने वेगळा असतो आणि असे म्हणतात त्यात सृष्टी निर्माताच अंश असतो, आई तू बोलत रहा आम्ही ऐकत राहू

प्रज्ञा ,नितीन व सचिन

## विशेष आभार

जागतिक मराठी अकादमी , अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ,आनंदवन सोसायटी ,श्री अरविंद दीक्षित, शशी मावशी ,श्री चंद्रकांत बोराटे , श्री एम आर कुलकर्णी,श्री वैभव अंभोरे ।

# अनुक्रमणिका


फुल वेडी.......................................................................................1

नक्की कशी आहे मी ..........................................................................3

उन्हाळा..........................................................................................5

घर .................................................................................................6

मस्त चाललय आनंदवनच..................................................................7

पिकलं म्हातारपण ...........................................................................10

पुस्तक ...........................................................................................12

दसरा .............................................................................................13

आनंद माळा ...................................................................................15

मळकट टेलीफोन .............................................................................16

नातेवाईक.......................................................................................17

जीवन चक्र ....................................................................................18

दरबार संताचा ................................................................................19

ताज ...............................................................................................20

मधुरा.............................................................................................22

कांदा झाला महाग...........................................................................23

यशोदेचा कान्हा ..............................................................................24

बाळकृष्णाचे रूप ...........................................................................25

तुमच्या प्रेमाचे .................................................................................26

हरी ...............................................................................................27

गौळण ....................................................................................28

नो न्यूज इस गुड न्यूज ...............................................................29

सीमा ......................................................................................30

वनश्री मनीषा............................................................................31

चित्रकार.................................................................................32

प्रभू श्री गजानना.......................................................................33

तु माझा चंद्र मी तुझी चांदणी......................................................34

कुंकवाची वाण .........................................................................35

मामाच्या गावाला जाऊया.........................................................37

हे रक्त कोणाचे ........................................................................39

तुझी माय.................................................................................40

तरीही मी सुगरण .....................................................................41

चारोळ्या.................................................................................42

पिकली पाने ...........................................................................43

बटाटा....................................................................................45

कोण कुठला तुम्ही....................................................................46

स्वायुष....................................................................................47

उठाई गीत...............................................................................48

कविता कशी करू मी ................................................................49

अरे संसार संसार .....................................................................50

दुःखाची जात ..........................................................................51

नातं........................................................................................52

नाही व्हायचं मला बारीक .........................................................53

बिनधास्त ........................................................................................ 54
कसे हो घडले असे ........................................................................................ 55
पुस्तक ........................................................................................ 56
जाऊदे रे जाऊदे कान्हा ........................................................................................ 57
आपली आनंदवन सोसायटी ........................................................................................ 58
पाठवणी ........................................................................................ 59
नेत्याचा पुतळा ........................................................................................ 60
पाठमोरी ........................................................................................ 61
आषाढी एकादशी ........................................................................................ 62
वार्धक्याची काठी ........................................................................................ 63
बायकांचे डायटिंग ........................................................................................ 64
काव्यांगण ........................................................................................ 65
नव न्यारे नवन्यारे ........................................................................................ 66
सात वऱ्हाडी आणि एक कऱ्हाडी ........................................................................................ 67
माझी फॅमिली ........................................................................................ 68
नमो नमः ........................................................................................ 69
गॅस साठी डायटिंग ........................................................................................ 70
पारिजातक ........................................................................................ 72
शीतयुद्ध ........................................................................................ 73
वर संशोधन ........................................................................................ 74
अन्न हे पूर्णब्रह्म ........................................................................................ 76
अश्विन शुक्र पौर्णिमा ........................................................................................ 79
कुठल्या घरात काय ........................................................................................ 80

आनंद वनाचे देऊळ ....................................................................83
पान खाये सैया हमारो ..............................................................85
गप्प गप्पा गप्पीष्ट......................................................................87
शो मस्ट गो ऑन........................................................................89
फुकटे मेले ................................................................................91
झोपेत जागले मी .......................................................................93
असे हे क्रूर................................................................................95
आपला हात जगन्नाथ .................................................................97
बांधले आडाखे मिळाले तडाखे....................................................99
अशा जाहिराती अशा जाहिराती हसव्या अन फसव्या ......................103
कशाला वाटावी वृद्धत्वाची भीती ..................................................106
वस्त्र एक मोहिनी अस्त्र ..............................................................109
जाते मी गिरीजेच्या गावी...........................................................112
मै हु ना......................................................................................115
संशय मनी हा आला .................................................................118
डायबेटिस एक अनुभव.............................................................123
प्लीज लिव्ह मी अलोन ..............................................................125
छोटी अद्विता.............................................................................127
मेरी पोती ..................................................................................128
भारत........................................................................................129
श्रवण और दशरथ ......................................................................130
भारत मां के आंसू.......................................................................131
भेदभाव.....................................................................................132

पिकनिक ........................................ 133
लड़की का ससुराल ........................................ 134
राम आज तेरी जरूरत है ........................................ 135
बसंती चोली ........................................ 136
वंश की वृद्धि ........................................ 137
दोस्त ........................................ 138
मेरा बचपन ........................................ 139
कमर दर्द ........................................ 140
टेंशन ही टेंशन ........................................ 141

# फुल वेडी

कळत नव्हते तेव्हापासून वेड होते फुलांचे ,जन्मापासून मरणापर्यंत मैत्र होते फुलांचे ,मातेच्या उदरात जेव्हा घेतला खोल पहिला श्वास जन्मा आधीच जाणवला फुलांचा

गोड वास .लुकलुकल्या डोळ्यांनी जेव्हा पहिल्यांदा जग पाहिले प्रियजनांच्या रंगीत फुलांनी तेव्हा जंगी स्वागत केले, डगमगती टाकता पावले तोडू लागले फुले बागेतील

रंगीत फुलांनी मन आनंदाने डुले, कळी प्रमाणे हळूहळू उबलू लागले योवन ,गुणगुणत फिरू लागले भुंगे त्यांनाही लागली कुण कुण ,वयात येतात सुगंधाचा नवा अर्थ कळला

शेपटयावरती रोज सुगंधी गजरा रुळू लागला, भेटला साजन मिळता नयन विसरले जगाचे भान ,अबोल प्रीत व्यक्त व्हायला फुलांची देवाणघेवाण फुलांनी सुशोभित मंडप,

तिथे शुभमंगल झाले फुलांच्या मुंडावळ्या फुलांचे हार गळ्यात पडले ,पहिल्या रात्रीची शहीया सजली फुलाफुलांनी झाली उंदमुक्त सुगंधाने प्रणयोतसुक कामिनी.

फुलांच्याच साक्षीने मधुमधुर मिलन घडले, किती हळूवारपणे कौमारयॉचे फुल खुडले ,काय बाई झाली किमया, झाला अद्भुत चमत्कार डोहाळतुलीही सजली,

सुगंधी फुलांनी भारंभार अंगणी लावला बगीचा, सगळीकडे फुलेच फुले,

झोपाळ्यावर बसून लाडकी आनंदाने झुले नऊ मास,नउ दिस, आई झाले, अभिनंद नाचे पुष्पगुच्छ घेता थकून गेले, फुलाफुलांनी सजला रंगीत सुंदर पाळणा, चिऊ काऊ भु माऊ गर्दी करित रघु मैना,

बागेतून येतो नित्य सुगंधी वास तरेतरेंच्या फुलांनी नित्य लागे सजू देव्हारा, झाली मुले मोठी घरी शुभ कार्य झाली, फुले फुलांमुळेच तर खरे शुभकार्याला शोभा आली, फुलांनीच तर दाखवला

आदर, श्रद्धा, प्रेम, जिव्हाळा .परमेश्वराच्या भक्तीसाठी चढवल्या फुलांच्या माळा, जेव्हा बसवले आदराने अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर फुलांच्या माळा फुलांच्या गुच्छ त्यांनीच न झाला सत्कार.

दिवस महिने वर्ष गेली बघता बघता साठी आली ,तेव्हा या फुलांनीच तर कौतुकाने दात दिली.

जेव्हा आजारी पडले सेवाकर्ती सुना मुले, चिडणऱ्या रडणऱ्याचे कौतुक उशापायथ्याला ठेवून फुले.

पडले दात पिकले केस, गजरेचा सोसेना भार ,फुलांचा शोक थोडास सुटतो फुले मागवायची दोन-चार ,केवढा मोठा प्रवास झाला धन्य झाले जीवन साठा, उत्तरांची कहाणी, पाचा उत्तरी सफल संपूर्ण.

एक दिवशी अचानक काळाने घातली झडप ,काळोखात मोठ्या लाटेत सुंदर फुले झालि गडप, कळीचे होते फूल ,फूलाचे होते फळ, पिकलेले फल शेवटी जमिनीवर गळून पडते.

फुलांमध्ये फुल होऊन हरवून गेले , बाळपण,योवन, वृद्धपण ही गेले ,कालचे फुल आजचे निमालय निघालि शेवटची यात्रा, तिरडी फुलांनी सजली ,फुल वेडी ही अखेरी फुलांमध्येच जाऊन नीजलि ,

जन्मापासून मृत्यूपर्यंत फुलांनीच केला पाठलाग, गेली स्वर्गी निघून ही, खली राहिली सुंदर फुलांची बाग।

# नक्की कशी आहे मी

थोडासा येतो राग जास्त वाटते वाईट अवास्तव बडबडल्याने पोझिशन होते टाईट,

नक्की काही समजतच नाही

कुणी म्हणतात कच्ची कुणी म्हणतात पक्की कुठेतरी अपयशी कुठेतरी लकी,

नक्की काही समजतच नाही

कुणी म्हणतात प्रेमळ कोणी म्हणतात लबाड नाही येत कोणाच्या आड थोडीशी आहे दवाड,

नक्की काही समजतच नाही

कुणी म्हणतात लेखिका कोणी म्हणतात कवी पुष्कळ करते बडबड जराशी मिळताच चावी,

नक्की काही समजतच नाही

कुणी म्हणतात वेंधळी कोणी म्हणतात गबाळी भजनाला जाते पण वाजवत नाही टाळी,

नक्की काही समजतच नाही

कुणी म्हणतात सरळ कुणी म्हणतात भाबडी स्टेजला पाहून वळते हिची बोबडी कोणी म्हणतात अशक्त कोणी म्हणतात मोटी कधी बनवतात मोठी कधी लेखनात छोटी,

नक्की काही समजतच नाही

कुणी म्हणतात शहाणी कोणी म्हणतात वेडी कधी मी व्हायची ही बिनभान लेडी,

नक्की काही समजतच नाही

घरातले म्हणतात बाहेर असते बाहेरचे म्हणतात घरात असते काय माहिती कुणाला कुठे मी दिसते,

नक्की काही समजतच नाही

कोणी म्हणतात गोरी कोणी म्हणतात काळी कुणी म्हणतात धूर्त कोणी म्हणतात बावळी,

थोडीशी गुणी बरीशची आहे अवगुणी असे म्हणतात बाई मला कुणी कुणी,

नक्की काही समजतच नाही

कुणी म्हणतात रिपोर्टर कोणी म्हणतात सफरशी मलाच का समजत नाही आहे मी कशी,

सोडत नाही आनंदवन म्हणून कुणाच्या कपाळावर आठी नका जाऊ इथून म्हणून प्रियजन लागतात पाठी,

नक्की काही समजतच नाही

कशीही असली तरी आनंदवनातच राहायचं सगळ्यांची मर्जी सांभाळून त्यांच्याबरोबर चालायचं,

जेव्हा मी वरती स्वर्गात जाईल ,कसे घडवले मला देवालाच विचारीन,

समजलंय पण उमजतच नाही।

# उन्हाळा

दिवस आले लांबलचक तासांचे ,
दिवस आले आळस केवळ घ्यायचे,
दिवस आले तडपत्या उन्हाचे,
दिवस आले नकोश्या घामाचे,
दिवस आले आंबट गोड सरबतांचे ,
दिवस आले थंड थंड पाण्याचे ,
जाई जुई मोगरा यांच्या सुवासाचे ,
दिवस आले मुंग्या पाली सारख्या प्राण्यांचे ,
दिवस आले दुपारी मस्त सुस्त व्हायचे ।

# घर

घर असावे घरासारखे नको नुसत्या भिंती,
तिथे असावा प्रेम जिव्हाळा नको नुसत्या नाती,
त्या शब्दांना अर्थ असावा नको नुसत्या वाणी,
सूर जुळावे परस्परांचे नको नुसती गाणी,
त्या अर्थाला अर्थ असावा नको नुसती नाणी,
या घरट्यात मिळून राहणे होऊन दिव्य छावणी,
आकांक्षांचे पंख असावे उंबऱ्यावर भक्ती।

# मस्त चाललय आनंदवनच

बाहेरून आला फोन आनंदवनात काय चाललंय ,

तत्काळ उत्तर दिलं मस्त चाललंय आमचं,

साठी सत्तरीच्या भगिनी आम्ही,

आरती भजन करतो नेहमी ,

एकमेकांच्या प्रसंगी पडलो कामी ,

आनंदवनाला आमची नेहमी सलामी,

बोनस आयुष्य कौतुकाचं,

म्हणूनच म्हणते मस्त चाललय आनंद वंच,

महिन्यातून एकदा भिशी करतो,

पथ्य वगैरे सोडून भरपूर खातो ,

इकडचं तिकडचं गॉसेप करतो,

चुकलं कोणाचं तर कान ही धरतो,

उत्तमच चाललय महिलांचं,

म्हणूनच म्हणते मस्त चाललंय आनंदवनच ,

16 भाऊजी हिरवळी वर बसतात ,

मनसोक्त विनोदी गप्पा मारतात,

राजकीय स्थितीवर चर्चा करतात ,

जेवायची वेळ होताच घरी जातात,

छानच चाललंय त्यांचं ,

म्हणूनच म्हणते मस्तच चालल्या आनंदवनच,

महिन्यातून एकदा फन पार्टी करतात,

आपली आपली पोळी भाजी खातात,

कोणी प्रसाद आणतो गोडाचा घास,
पार्टीची लज्जत त्याने वाढते खास,
आनंदात चाललय त्यांचं ,
म्हणूनच म्हणते मस्त चाललय आनंदवनच ,
चष्म्यातून सारे कसे स्वच्छ दिसते ,
श्रवण यंत्राने नको तेही डोक्यात येते ,
नवीन दातांनी चांगलं चावलं जातंय,
हातातल्या काठीने चालायला जमतं ,
अडतय का कुठे वृद्धांचं ,
म्हणूनच म्हणते मस्त चाललय आनंदवनच ,
हिरवळीवर मुले क्रिकेट खेळतात ,
आजूबाजूच्या सुंदर काचाही फोडतात ,
येणाऱ्या जाणाऱ्या च्या पाठीत बॉल मारतात ,
रागवायला गेले तर पसार होतात ,
काही चुकतंय का त्यांचं ,
म्हणूनच म्हणते मस्त चाललय आनंदवनच ,
वाद विवाद होत नाही असं नाही ,
पण त्याचे पडसाद बाहेर जात नाही ,
आम्ही एकमेकांना सांभाळून घेतो ,
गळयात गळे घालून मिळून असे राहतो ,
हेच रहस्य आनंदवनाचं,
म्हणूनच म्हणते मस्त चाललंय आनंदवनच,
साजरा होतो गणपतीचा सण,
उत्साहाने भरून जाते आनंदवन,

दर्शनाला गर्दी करतात भक्तजन,

खुश होऊन जातात बाहेरचे जण,

पुनर्जन्म घेऊन इथेच यायचे,

म्हणूनच म्हणते मस्त चाललंय आनंदवनच।

# पिकलं म्हातारपण

म्हातारपणाला नाव छान,
कोणी म्हणत संन्यास आश्रम,
कोणी म्हणतो वानप्रस्थाश्रम,
आपण म्हणायचं आनंदाश्रम,
म्हातारपणात कसं राहायचं,
घरात असेल तर आश्रम सारखं ,
आश्रमात असेल तर घरासारखं,
कशातच कुठे गुंतायचं नसतं,
जुन्या आठवणी काढायच्च्या नाही,
आमच्या वेळी म्हणायचं नाही ,
अपमान झालं समजायचं नाही,
उगाच लांबन लावायची नाही ,
सुखाची भट्टी जमत जायची,
सगळ्यांची दोस्ती जुळवत राहायची,
यम लोकाला लांब पळवायचं ,
आनंद सारखं वाटत जायचं ,
म्हातारपण सुद्धा छान असतं ,
लेन्स मधून सारं स्वच्छ दिसतं ,
नव्या दातांनी सहज चावत ,
कानयंत्राने ऐकायला येतं ,
बागेत जाऊन फिरून यावं ,
मैत्रिणी जमून पत्ते कुटावं ,

देवळाला टेकून भजन करावं,
टीव्ही मधल्या सिरीयल बघावं ,
मुलांसमोर गप्प बसावं ,
नातवंडाशी खेळत राहावं,
मैत्रिणीशी बोलत सुटावं ,
थोडं फार गॉसिप करावं,
जमेल तेव्हा बाहेरगावी जावं,
एखादा दुसरा फंक्शन अटेंड कराव ,
वेळ मिळेल तेव्हा गाणं गाव,
कंटाळा आला तर झोपून जावं ,
छान रंगवावी सुराची मैफिल ,
मस्त जमवावी जेवणाची पंगत ,
सुरेल जुडवावी गप्पांची संगत ,
लुटत राहावी जगण्याची गंमत,
श्वास घेत दात देत,
तृप्त मनात आनंद होत,
हसत हसत निघून जावं ,
पिकलं पान गळून पडावं ।

# पुस्तक

ज्ञान देणारे गुरु असते पुस्तक,

धार्मिक ग्रंथापुढे झुकते मस्तक,

पुस्तकच असते ज्ञान वर्धनाचे हस्तक ,

सुसंस्कृत बनवण्या यास पुस्तक देते दस्तक,

पुस्तका सारखा मित्र नाही,

शिक्षणाशिवाय गतयंत्र नाही ,

बिना पुस्तक व्यक्ती अशिक्षेत राही,

उन्नतीसाठी पुस्तकच असते सही,

# दसरा

नऊ दिवसाच्या रात्री नंतर उगवतो सुंदर दसरा,
प्रेमाने करूया स्वागत ठेवूनी चेहरा हसरा,
दुष्ट रावणाला जाळूनी करा काळा ,
गुणी रामाच्या गळयात फुलांच्या माळा ,
यातून अर्थ असा तुम्ही दुर्गम त्यागा,
रामाचे चरित्र ऐकून तुम्ही सगुणी वागा,
या दश दिनी राम नामाचा होतो जप,
उपवासाच्या पदार्थांचा फळ फळांचा होतो खप ,
उगती बिन पेरूनी रोपे ठेवूनी मध्ये घडा,
कशी करावी शेती यातूनच मिळत असावा धडा षष्ठीपासून काळी करते दुष्ट राक्षसांचा संहार ,
म्हणूनही तिच्या गळयात पडती असंख्य हार ,
दहा दिवसांची बहुतानला मिळते सुट्टी,
तीच रामलीला दरवर्षी तरी लोक न कंटाळती ,
तेच तेच पदार्थ सेवनी नऊ दिवसांचे करिती लहान ,
दसऱ्या दिवशी पुरुष करण्या जाती सिमो लहान,
शरीर शुद्ध होते उपासाने मनात जडते भक्ती,
सीमा उलंगलाने वाढते निरीक्षण शक्ती,
एकमेकाला सोने देऊनी करिती आलिंगन,
क्षमा करावी दुश्मना ला ठेवुनी मोठे मन ,
अल्पबुद्धीने लावला दसऱ्याचा अर्थ बरा ,
चुकले असेल तर जर काही क्षमा करा,

दहावया दिवशी येतो नवरात्रातच्या हा दसरा,
समजावितो आपल्याला कटूता विसरा ,
रामस्वरूपी भजू, रावण रुपी दुष्कृत्याचा बहा करा ।

# आनंद माळा

गुलाब शेवंगी झेंडू मोगरा करतात आनंदवन बागेचा साजरा ,

आपल्या बागेत राहायचे आनंदी पण मनातून होते एकटे बंदी ,

गणपतीच्या पायावर सर्व येऊन पडत पण एकटे एकटे सगळे बसत कुडत ,

सर्वांना वाटे एकच आपण रहावे एका दोऱ्यामध्ये होऊन मोरया गडी शोभावे ,

पुजारी आजोबा होते फार हुशार त्यांना कळला फुलांच्या मनातला विचार,

पुजाऱ्यांनी चाहूबाजूंनी फुल केली एकत्र सुरेख गुंतली माळा फुले होती सौमित्र,

सुख्ख दुःखामध्ये राहू लागली सोबती एकटेपणाची त्यांची पळाली भीती ,

अशी ही शंभर फुलांची आनंद माळा तुम्ही प्रेमाने हो गणरायाला घाला ,

गणेशाच्या आशीर्वादाने उजळे हे आनंदवन ,

उत्कर्ष त्याचा होऊ दे नित्य क्षणोशन ।

# मळकट टेलीफोन

तीक्ष्णदृष्टीने टिपला जरासा मळका टेलिफोन ,

कौतुक वाटले पाहून तुमच्या सफाईचा दृष्टिकोन ,

सर्वांना वाटते आरशा सारखे असावे सुंदर घर ,

पन कारणे असते अनेक माणूस होतो मजबूर,

धुळीची एलर्जी ने पडेल लगेच आजारी तुरंत जाऊ लागेल डॉक्टरच्या दारी ,

वृद्ध अवस्था आजार एलर्जी थोडासा आळशी स्वभाव त्यामुळे होतं असावा चकचकीत सफाईचा अभाव ,

समज आहे चुकीची ,

अस्वच्छतेने लागतील रोग ,

पूर्वजन्मीच्या असतो भोग ,

इन्फेक्शनची नका बाळगू भीती फिरता तुम्ही गावोगावी, रोगावरच्या गजाननाची आहे मस्तका वरील तुमच्या छाप,

सजलेल्या ड्रॉइंग रूम शिवाय बघा कुणाकुणाची घरे,

म्हणाल तुम्हीच  वहिनी तुमचेच घर बरे ,

लिहिण्यात सांगवी माझ्याकडे आहे रगड ,

काचेचं घर जर माझे कसा फेकू कोणावर दगड,

क्षमा करा लिहिण्यामध्ये झाले असेल उचनीच ,

कितीही समजले तरी स्वभाव असतो कुत्र्याची शेपूट, घराचा नंबर आहे माझ्या 77,

पर्णकुटी माझ्या मनाला वाटते सुंदर हेवन,

झाले लिहून सगळे आता घेते औषधाची गोळी,

नका रागवू चूक झाली असेल लिहिण्याची,

अशक्त भोळी भाबडी वहिनी आहे तुमची,

# नातेवाईक

न वरा, न वरा तोच होतो नवरा ,

ज्याच्याशिवाय नाही गती तोच आपला पती, आपल्यासारखे करिते प्रयत्नि तीच खरी पत्नी,

जिच्या पोटी कन्या ती मला धन्यआ ,

ज्याच्या हातात माझी सूत्र तो आपला पुत्र

वाटणीसाठी अधीर तो सख्खादिर,

कधी ना देते आनंद ती सखी नणंद ,

घरात काय म्हणती ती आत्या नातीला आहे ऐकायला मन ,

का कु करते ती काकू ,

थोरली जाऊ करते भाऊ, धाकटी जाऊ खाणे खाऊ,

जी सोडवतील आपली पहेली ती जवळची सहेली ,

प्रसंग पडला की लगेच आठवतो काका ,

वेळेवर येतो कामी त्याला म्हणू मामा,

जो आपली करतो कदर तोच प्रेमळ ब्रदर,

भावाला करते जायबंदी ती कौतुकाची भावजई ,

एक सारखे मिळतो आहेर ते सुंदर माहेर,

प्रसंगा धावून येई ती सखखी ताई ,

रिटायर्ड सासरा मार्केटिंग आसरा,

डोळ्यातून काढे असू ती सखखी सासू,

कितीही या जावया जा बया ।

# जीवन चक्र

सावधान सावधान वाचे बोला प्रभू नाम,
दहा वर्षे बालपण वीस वर्षे तारुण्य,
अंगी जडे अभिमान तेव्हा नकळे साधं सावधान,
पैसाची होय भरती कन्या पुत्र लाभ होती त्याचीच पडे भ्रांती न कळे स्वरूपाची स्थिती,
40 वर्षे झाली डोळयात चाळीशी आली,
नेत्रांशी भूल पडली अताना दिसे पायरी,
पन्नासाचे होय भरती श्याम केश शुभ्र होती,
दंतपक्ती हालती न कडे स्वरूपाची स्थिती,
साठीची होती भरती हाती घेऊनिया काठी,
वसावासा लागली पाठी त्याला हस्ती पोर्टी,
सतराच्या विवंचना बसल्याने उठवेना,
उठल्याने चालवे ना दिवसेंदिवस दिसेना,
चार दिशा मिळूनी 80 आता झाल्या दशो भिशी,
लोक करती कुज कुज, आता कोण रे ना तुझं,
राजहंस उडून गेला देह कोरडा पडला,
जन म्हणती गेला गेला, उठला अतिभार झाला।

# दरबार संताचा

विठुरे माझ्या देवा विठू,
तुझ्या भक्तामध्ये तुला भेटू,
तुझ्या नामाचे गोड स्मरण,
चुकविणे जणांचे जन्म मरण,
तुझा भक्त तुकाराम,
त्याने रोविले भक्तीचे खॉब,
तुझा भक्त ज्ञानदेव,
त्याने दिली अमृताची ठेव,
तुझा भक्त नामदेव,
तुझ्या प्रेमाची करी देवघेव,
तुझा भक्त एकनाथ,
दलितांना दाखविला भक्तीपत,
तुझा लाडला हा सोपान,
जगात तुझा वाढविल मान,
तुझी भक्तीन मुक्ताई,
तुझ्या सकट सर्वांची झाली आई,
तुझी लाडकी संत सखू,
आदराने तिच्यापुढे किती वाकू,
तुझा भक्त चोखामेळा,
भजन करविले वेळोवेळी,
तुझा भक्त गोरा कुंभार।

# ताज

---

ती बातमी कानावर आली,

देखणी इमारत डोळ्यासमोर आली,

तिलाही एक इतिहास होता ,स्वाभिमानाचा तुरा होता ,

पंचतारांकित हॉटेलमध्ये नाकारला प्रवेश,

म्हणून टाटांना आला जबरदस्त आवेश,

माझ्या देशात मला नाकारणारे हे कोण,

मीच एक पंचतारांकित हॉटेल बांधील,

अतिश्रमाने बांधले चालू लागले,

भारताचा अभिमान म्हणून नाव ताज ठेवले ,वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना म्हणून जगी गाजले.

अशा त्या वस्तूला नराधमाची नजर लागली,

ग्रॅनेड बंदुकीच्या जोरावर ताब्यात घेतली,

आजवर हिने बघितला आनंदाचा बहर,

तिथेच घडत होता नरसंहार,

जी मुंबईची शान होती,

देखने पणाची खाण होती,

ग्रॅनेड धारदार फुटत होती,

आणि पेट्या आगीच्या साथ होती,

देखने चित्र विद्रूप होत होते,

हताश भारतीय बघत होते,

पोलीस कमांडो मात्र शर्थीने लढत होते,

प्राणांचे मोल देऊन शहीद होत होते,

डोळ्यापुढे एकच ध्येय होते, लोकांचे प्राण वाचवायचे होते, अपराधी टिपायचे होते, दिवस रात्रीचे भान नव्हते,

असे 70 तास गेले सारे भानावर आले,

खिडकीतून एकदम विजयी खून आली,

जल्लोषाची एकच झुंड उगाली,

एक दृष्ट चक्र थांबले होते पण असे का बरे घडले होते,

दोन देशान चया भानडणात निरदोष का मरत होते।

# मधुरा

13 ऑगस्ट ला जन्माला आलं एक रतन,
सर्वांनी आनंदाने केलं साजरा जशन,
आजोळी वाढली ही गोड रत्ना,
मिरजकर म्हणाले हिला मधुरा म्हणा,
प्रेमळ स्वभावाने तिने जिंकली सर्वांची मन,
झाल्या तीन मुली कुटुंब भरले आनंदाने,
सर्वांना जीव लावून सोडली आपली गल्ली,
तीन कन्या पती संघ गाठलि तिने दिल्ली,
आपल्या गोड स्वभावाने ही दिल्लीकरांमध्ये मिसळली,
मदत करण्याच्या स्वभावने लोकप्रिय झाली,
मिळंसार स्वभावणे माणसे जोडली हजार,
अशा या मधुराला माझा आशीर्वाद बारबार।

# कांदा झाला महाग

काय भाव झाला हो यंदा,
बाजारातून गायब झाला हो कांदा,
घराघरातून भासला हो बंदा,
जेवणात कमी झाला हो कांदा,
मोठ्या व्यापाऱ्यांनी केला धंदा,
गोदामात साठवून ठेवला हो कांदा,
घराघरातून जमवा हो यंदा,
कॉमन महिलाला पाहिजे हो कांदा,
नॉनव्हेजला द्या तुम्ही खांदा,
घरात नाही हो बिलकुल कांदा,
आता विसराहो पंजाबी पराठा,
त्याला लागते हो भरपूर कांदा,
भाऊबीजेला रुसला हो दादा नॉनव्हेजला नव्हता हो कांदा,
विसरा नवा पदार्थ करण्याचा छंद,
कांदा शिवाय स्वयंपाक तुम्ही साधा,
पुन्हा परत येईल देशात संपदा कधीतरी होईल हो कांदाही मंदा,
कुणी कितीही म्हणा शेतकऱ्याच्या परमदैवत हो कांदा।

# यशोदेचा कान्हा

गोकुळात लपला बाई यशोदेचा कान्हा,
किती किती शोधू कुठे सापडेना,
शोधता शोधता गेली बाई कुजपणी,
मुरलीचा स्वर येतो माझ्या कानी,
जिथे जिथे दिसलेली पावलांच्या खुणा,
कृष्ण तुझ्या वागण्याने नसे घरबंद,
गोपियानला का लावली आपलं छंद,
गाईला राहावे ना पावसाविना,
गोकुळात सगळीकडे कृष्ण कृष्ण,
दर्शनाला यावे म्हणून हे वेडे शिष्य,
कळेल का तुला माझी भावना।

# बाळकृष्णाचे रूप

किती किती सुंदर हा गोपाळ,

कृतज्ञ भवानी कृतज्ञ जन हे हा कसाचा काळ गोजिरवाणे रूप सावळे,

किती साठवू नयनी नाकळे,

सुंदर तनु ही सुंदर सारे,

देवकीचा हा बाळ,

नयनांना बघू की करणांना,

मोरपिसे बघू की केसांना,

बघू चरणांना की चरणांच्या अतिसुंदर या चालेला,

मनमोहन तू मधुसूदन तू चक्रपाणी तू जनादिना तू,

हृदयी आमच्या सदा असो तू,

तू सर्वज्ञ त्रिकाळ।

# तुमच्या प्रेमाचे

स्मृती सुमनांचा सुगंध,

फुल आमच्या मनाचे,

विसरू कसे आम्ही दिन सुखाचे,तुमच्या प्रेमाचे,

जीवन दुसरे काय असते सुख दुःखाचा अनुभव, परस्परांच्या स्नेहभरती, दुखावल्या घाव,गतस्मृतीचे सुंदर सत्य स्वप्न भविष्याचे,

जीवन मार्ग कठीण व न सोप्पा,

मार्गी पाऊल सावरतानी हात देती धावून,

असेच संगी साथी राहो पुण्यमार्गाचे,

जीवनदर्शन घेण्यासाठी आम्ही निघाले प्रवासात,

तुमची आमची सोबत झाली मार्ग संपला कसा,

आठवणीचे धागे कच्चे घट्ट बंद प्रेमाचे,

विसरू कसे आम्ही दिन सुखाचे ,तुमच्या प्रेमाचे,

विसरू कसे आम्ही दिन आनंदवनाचे।

# हरी

धावत धावत हा हरी येतो,
मैया मला लोणी दे म्हणतो,
बारा घरच्या बारा जणी,
विकायला जाती दही दूध लोणी,
वाटेत गोविंदा आडवितो,
गोपिकांना लोणी दे म्हणतो,
साठून ठेवले शिक्यात लोणी,
आजूबाजूला नाही दुसरे कोणी,
हळूच हळूच मुरारी हा येतो,
राधे मला लोणी दे म्हणतो,
माय देवकीचा हा कान्हा,
यशोदे मैया चा हा कान्हा,
गोपाला गोपाला लोणी खाऊ घालतो,
मैया मला लोणी दे म्हणतो,
सिंहासनी हा जरी बसला,
गोकुळाला कधी ना विसरला,
सुदामाचे पोहे पण खातो,
रुक्मणी रुक्मणी ला लोणी दे म्हणतो,
चोरूनी खाल्ले ज्यांनी लोणी,
अशक्य त्यांना पाहिले कोणी,
असा असा कन्हैया सर्वांना आवडतो,
भक्तांना भक्तांना लोणी द्या म्हणतो ।

# गौळण

धोंगडीवाला कानहा कुठे लपला हो कुठे लपला,

ठाई ठाई शोधुनिया जीव दमला,

रानामध्ये गेलो गावामध्ये आलो देवाऱ्याशी गेलो तिथे नाही दिसला, काना नाही दिसला,

ठाई ठाई शोधुनिया जीव दमला,

आळंदीला गेलो पंढरपुरी आलो,वाळवंटी गेलो ,

तिथे नाही दिसला कान्हा नाही दिसला

ठाई ठाई शोधून या जीव दमला,

द्वारकेशी गेलो मथुरेला आलो गोकुळाला गेलो,

तिथे नाही दिसला कान्हा नाही दिसला,

ठाई ठाई शोधुनिया जीव दमला,

एका जनार्दनीपूर्ण कृपेने राधिकेच्या घरी गेलो,

तिथे मला दिसला कान्हा मला दिसला,

हरी मला दिसला,

ठाई ठाई शोधुनिया जीव दमला,

# नो न्यूज इस गुड न्यूज

राजेश व प्रज्ञा यांना,

तुम्ही रमला इतरत्र म्हणून येत नाही पत्र,

तुम्ही लावला नाही फोन आम्ही बाई कोणाचे कोण,

मी तर बाई आहे आळशी,

पत्र लिहिण्याचा खूप येतो कंटाळा,

आपल्याला वाटतो पटकन फोन हाच उपाय,

पत्र लिवायचे रहाडा,

शेवटी विचार करून सुखावले मी,

डोक्यात लागला उजेडचा फ्युज,

नो न्यूज इस गुड न्यूज नो न्यूज इस गुड न्यूज ।

# सीमा

---

सावळा तुझा रंग पांढरे शुभ्र तुझे केस,
सीमा तू सोडूनी गेली मैत्रिणी झाल्या उदास,
देवळातल्या एक कोपरा बघ दिसतोय भकास,
सगळ्यांनी यावे भजनाला असे तुझा हेका,
जरी जमल्यास सगळ्यातरी कशा ऐकू तबल्याच्या ठेका,
आजारी असेल कुणी तर विचारील आहे का बरा,
मारुतीला नियमित मारीत असे 11 फेऱ्या,
मारुतीच्या आरतीला सतत घंटी वाजवायला उभी,
गोड बोलून चौकशी करणे ही तुझी होती खुबी,
मृत्यूची शंका कळले तुला म्हणून फिरली गावे भराभरा,
नातवंडांची काळजी आणि सगळे लक्ष असे घरावर ,
आदर देऊनी पुरुषांना सर्वांना म्हणायची दादा,
अगं परत येण्याचा करून गेली होती ना वादा,
शाळेची तू कधीही न केली सुट्टी,
मग सगळ्यांची का करून गेली कट्टी,
जायचे आहे सगळ्यांना माहित आहे बाई पण इतक्या लवकरच जाण्याची का होती घाई,
काही भजनात असा लावला सूर ,तुझे भजने गायाला मनी लागले हुरहूर,
शेवटची ना झाली भेट न पाहिले तुला,
येशील का परत तू भास होतो मनाला।

# वनश्री मनीषा

लक्ष देऊनी ऐका वनश्री राम मनीषा, केळवण करितो तुम्हा वंदुनी श्रीगणेशा,

बाळ पणी म्हणत होता ,बाळी उभी राहिली कोणी नाही पाहिली,

तुमच्या जीवास वेड लावूनी आता सर्वांसमत सासरी निघाली,

वृद्धांचा असतो संस्कार जुने ते सोने,

जनरेशन गॅप चे म्हणणे नवे तेच हवे,

गोड बोलणी परी सर्वांचा कलाने घ्यावे, दोघांची सांगड घालूनी जिंका सर्वांची मन,

आशीर्वाद दिला असतोच माता पित्याने, पल्लवी स्वातीच्या दोन डोळयात अश्रू एक माहेरचा विराहांचा दुसरा सासऱ्या सासरच्या सुखाचा,

गोड वागुनी जिंका मने ,आशीर्वाद घया सर्वांचा, वनश्री मनीषा आपुल्या गुणवान लेकीचे करती कन्यादान,

जगी होऊनी धन्य या पुण्य मिळवाल महान, तुम्ही दोघीही मुलींची संस्कारी जोपासना केली,

ज्याची होती त्यांनी नेली आईची माया व्यथेची मोठी।

# चित्रकार

मला तू रंगवलेला सहज सुंदर चित्रकार,
मनाला माझ्या मोहनी गेला अतिच फार,
असेच तरी तऱ्हेचे रंग भरून दे तुझे मना,
अवतीभवती निरक्षणओ पहा योग्य क्षण,
अशीच करत रहा तू कविता वर कविता ,
पुढे पुढेच जा तू मागे वळूनी पाहून नको गीता,
कविता तुझ्या असती गहन,
अर्थ उपदेश देऊनी तू त्या करीत रहा वहन,
त्या चित्रकाराचे तुझं हवे होते ना नाव,
अगं हृदयी असे तुझ्या तो देई त्यास ठाण,
अशीच येऊ दे तुझं कविता करायची स्फूर्ती,
काकू तुझी ही आशीर्वादाचा हात ठेवते मनापूर्ती।

# प्रभू श्री गजानना

प्रभो श्री गणेशा आशीर्वाद द्यावा,
पंचारती ओवाळीतो हेतू पूर्ण व्हावा,
दुःख दैन्य सारे मोरया हरावे,
सिद्धिविनायका बरे ते करावे,
गौरीनंदना भक्ती भावे वंदन करितो,
मान्य करावी आमुची सेवा,
प्रभू श्री गणेशा आशीर्वाद द्यावा,
कृपा हष्टी राहो दिनदसावरी,
हीच एक आस आमच्या अंतरी,
गणपती गजानना भक्ती भावे,
उत्सव करितो आम्ही आनंदवणे,
प्रभू श्री गणेशा आशीर्वाद असावा,
वेडी वाकडी मान्य करी सेवा,
दर्शनाचा लाभ प्रतिवर्षी द्यावा,
हीच मनोकामना पूर्ण करी देवा,
दया सागरा मिळो भक्ती सेवा,
श्री गणेशा आशीर्वाद द्यावा,
जोडोनिया कर बाप्पा विनवितो,
आनंदी मनसे भजन अर्पितो,
भजन गात असे भजनी मंडळ रंग भरावा आज गायना ,
हीच प्रार्थना गणराज देवा ,
श्री गणेशा आशीर्वाद असावा ।

# तु माझा चंद्र मी तुझी चांदणी

नको म्हणूस मला,
तु माझा चंद्र मी तुझी चांदणी,,
नको म्हणूस मला, तु माझा चंद्र
चंद्रावर आहे डाग अन माती,
असा ओसाड जागेवर नको जोडूस,
आपल्या प्रेमाच्या संसाराची नाती,
तु जर का म्हणालिस मला चंद्र,
भाकबिजळ ओवाळतील साऱ्या नारी,
पुरुषासारखा पुरुष आहे मी,
इकडे तिकडे बघायचे होईल चोरी,
तुला जर वाटत असेल मी चंद्र,
त्यावर आहे काळा डाग,
माझ्या चारित्र्याची होईल चर्चा,
तेव्हा तु जरा सांभाळून वाग,
तुला वाटत असेल मी हवावे चंद्र,
पोर्णिमेला होईल जाड, अमावस्येला बारीक
प्रेमाने दय़ावी लागेल तुला,
चांदिच्या वाटीत बदाम खारीक,
म्हणून सांगतो, नको म्हणूस मला
तु माझा चंद्र मी तुझी चांदणी,
काळच तर जयपूरून आनली आहे
तुझ्यासाठी खूप सुंदर बांधणी।

# कुंकवाची वाण

झाले मी अनाथ,
गेला सोडुनी प्राणनाथ,
न जावे वाटे समारंभ,
नाही गोडीहि सणांत,
उठता उठता कोसळला,
प्राणनाथ माझा क्षणांत,
धड गेले हो निघोनी,
सोडुनिया दोन्ही हात,
आता अश्रू आवरिते,
मुखाकडे त्यांच्या पहात,
किती समजाविले मना,
नाही दिसणार पुन्हा,
कशी जाऊं जंगापुढे,
जणुं मीच केला गुन्हा,
राहिले या आनंदवनी,
मन सावरले गेले,
मैत्रिणींच्या सहवासी,
माझे दु:ख बोथटले,
देती संक्रांतीचे वाण,
भेट सप्रेम म्हणूनि,
स्वीकारते दु:खी मने,
गेला कुंकवाचा धनी,

गेला सोडुनी एकटी,
नाही उरले प्राण,
कपाळीच्या कुंकवाची,
सतत जाणवते वाण ।

# मामाच्या गावाला जाऊया

पपांच्या गाडीत बसूया,
मामाच्या गावाला जाऊया,

मामा मोठा बागाईतदार,
गावात त्याच्या फॅक्टरी बार,
संत्री रस्स पिऊया,
मामाच्या गावाला जाऊया...............१

मामी मोठी सुगरण,
रोज रोज ब्रेड चिकन,
मटन मासे खाऊया,
मामाच्या गावाला जाऊया...............२

मामी मोठी आधुनिक,
कधी न मळते कणिक,
पाव भाजी खाऊया,
मामाच्या गावाला जाऊया...............३

नटते मामी, करते फेशिअल,
सारखी सारखी बघते सिरिअल,
मामीच्या बरोबर फिरायला जाऊया,
पिझ्झा बर्गर खाऊया,
मामाच्या गावाला जाऊया...............४

मामा आमचा खूपच हुशार,

पपांना घेऊन होतो पसार,

सोडा बाटल्या त्यांना देऊया,

केक आईस्क्रीम खाऊया,

मामाच्या गावाला जाऊया...............५

# हे रक्त कोणाचे

आजारामुळे खूप झाले अशक्त, हॉस्पिटलमध्ये चढवले बॉटलचे रक्त,

मातापित्या चया रक्तापासूनही झाले विभक्त, कुणाचे बरे असेल हे बॉटलचे रक्त,

कॅसेट लावूनी सिनेमे पहावे नट नट्यांचे इंटरव्यू बघत राहावे सिरीयल मधील फॅशन बघावी फिल्मी जीवनाविषयी मी का आसतक,

एखाद्या चीरतरुनीचे तर नसेल हे रक्त,

सहा पराठे दह्याबरोबर खावे, एक किलो दूध बदाम घालून प्यावे, जोर बैठका काढून जमावे का वाटते ,तब्येत बनावी सशक्त एखाद्या पैलवानाचे तर नसेल हे रक्त,

सुनेने एखादी आगळीक करावी रागाने, तिचं जाणून घ्यावी कठोर सासूची भूमिका, करावी प्रेमळ सोनेसाठी का बनावे सक्त ललिता पवार सारखी चे नसेल हे रक्त ,

खूप खूप वाचावे कविता ,लिहावी खावे प्यावे जीवनी मजा करावी दुसऱ्यांची कधी परवा ना करावी ,का वाटते असे जीवन जगावे बिनधास्त एखाद्या कटिंगणाचे नसेल हे रक्त,

देवळात देवाचे दर्शन घ्यावे ,भजन कीर्तन आणि मन रमवावे सुंदर शांत जीवन जगावे, जीवनी असतं मन होईल परास्त, कुणा साधू संतांचे तर नसेल हे रक्त,

सगळयांच्या रक्ताचा रंग लाल, पेशंटच्या तब्येतीत करे कमाल ,जीवनी भरतो सुंदर मधुरताल, तब्येत सुधारता झाले मी आश्वस्त, कुणाचाही असू दे हे बॉटलचे रक्त।

# तुझी माय

एका मातेची नसे ही व्यथा ,ज्यांची मुले दूर त्यांची हीच कथा ,पापी पोटासाठी तुला राहावे लागते दूर एकटी असताना मी मनास माझ्या वाटे हुरहुर,

28 वर्षाचा वाढवूनी दिला सुनेच्या हाती ,आठवण येताच तुझी सैरभैर होते माझी मती , अजूनही भासती दोरी वरती लंगोट वाळती आंगडे,

स्मरते बालरूप तुझे घरभर रांगताना उपळे,

उभा राहुनी घरात तू टाकले पाहिले पाऊल, प्रियाजनांना लागली तुझ्या चालण्याची चाहूल,

चिऊ काऊ चे नाव घेऊनी भरविला भात, बाहेर जाशील सारखा म्हणून कोंडले घरात , शाळेत जातानाची आठवणी तुझी ,बालमूर्ती खोड्या काढून तिथेही वाढविलीस

आपुली कीर्ती ,तक्रार घेऊन येती बनाया अनिल राजू ,चुकले तुझे असले तरी घ्यायची मी तुझीच बाजू ,वाढत चाललेल्या तक्रारी लोकांचा येई राग मात्र हृदय माझे

तुझ्यावरचा प्रेमाचा तो भाग,

शिक्षणासाठी मला सोडून गेलास तू दूर ,उदास झाले मी जेवण झाले बेसूर ,उन्नतीसाठी मी मन केले माझे घट्ट, वाट पाहता पाहता वर्षे गेली पटापट,

नोकरी लागली तुला, मन झाले माझे संतुष्ट बऱ्याच गोष्टी शिकवल्या तुला ज्या वाटल्या इष्ट दूर असताना तू ,

तुझ्या फोटोचीही काढली दृष्ट, ईश्वरचरणी आरोग्यही मागितले ,होण्यास तू हिरेस्टपुष्ट, योग्य वेळ येताच केले दोनाचे चार हात,

तुझ्या मनासारखया पत्नीची मिळवून दिली साथ, नऊ महिने पोटात वाढविले आतड्याचे कातडे, आशीर्वाद बाळा तुला नको टाकू कधी पाऊल वाकडे उंच उंच भरारीसाठी ,

पंखात येऊ दे शक्ती, उडालास किती उंच तरी जुन्या उंबरठ्यावर ठेव भक्ती, जेवताना अडखळतो घास इथे, तुझया साठी देवाने मज बनविले बाळा तुझी माय तुझी माय ।

# तरीही मी सुगरण

मऊ मऊ झाले शंकर पाळे ,बेसनाच्या लाडूने चिकटले टाळे,

चकल्यांनी तर तेव्हाच टाकल्या माना, बेसनाच्या शेवेने लांबलचक घेतल्या ताना,

अनारसे तुपात पडतात हसले, चिरोटे पाकात जाऊन फसले, रव्याच्या लाडू म्हंटला कुठला दात पाडू, डिंकाचा लाडू म्हणाला डब्यातून नको काढू,

कडबोळीची तर मुळीच लागत नाही चव, करंजीला कमी पडला नारळाचा खव,

सगळयांना आवडला खुशखुशीत चिवडा, बाजारातून आणला होता फक्त तेवढा,

अशी झाली दिवाळीची फराळाची तरा, मुले म्हणाली तुझ्यापेक्षा हलवाई बरा,

खाऊन पहा माझे तुम्ही मुगाचे वरण, खरोखर म्हनाल मला बाई सुगरण ।

# चारोळ्या

लग्न करून फसलो आपण असं बहुतेकांना वाटत असतं पण लोकांना ते दाखवायचं नसतं मनात मात्र सतत खदखदत असतं,

का करते आज ही माझ्याशी लाडीगोडी पाहिजे वाटतं हिला मार्केट मधली नवी साडी,

दिल्ली एक सुंदर शहर होतं जगात त्याचे खूप नाव होतं, दिल्लीत झाली आता वाहनांची गर्दी दिल्लीकरांना होते पोलुशन मुळे सर्दी,

कळवळून मनाली पत्नी कितीदा, करा आता काहीतरी धंदा, थोडे दिवसांनी लोक म्हणाले आता शोभतो संसारी बंदा,

डौलात येणाऱ्या सुंदरीला पाहून युवक म्हणाला हाय डियर, लपवलेले मंगळसूत्र दाखवून मनाली सॉरी रॉंग नंबर,

ती दिसताच समोर नको खाऊस भाव, मागची मारलेली थप्पड आठवते का तुला राव।

# पिकली पाने

म्हातारपणाला नांवं छान,

कोणी म्हणतात संन्यासाश्रम,

कोणी म्हणतात वानप्रस्थाश्रम,

आपण म्हणूया आनंदाश्रम,

म्हातारपणात कसं रहायचं,

घरात असले तर आश्रमासारखं,

आश्रमात असले तर घरासारखं,

कशातच कुठे गुंतायचं नसतं,

जुनी आठवणी काढायच्या नाहीत,

आमच्या वेळी सारखं म्हणायचं नाही,

अपमान झला समजायचं नाही,

उगाच लांबण लावायची नाही,

सुखाची भट्टीजमवत जायचं,

साऱ्यांची दोस्ती जुळवत रहायचं,

रागा लोभाला लांब ठेवायचं,

आनंद सारखा वाटत जायचं,

म्हातारपण सुध्दा छान असतं,

लेन्समधून सारं स्वच्छ दिसतं,

कान यंत्राने ऐकायला येतं,

नव्या दातांनी चावळही जातं,

पार्कात जाऊन फिरून यावं,

मित्रमंडळी जमवून पत्ते कुटावं,

देवळात टेकून भजन करावं,
टीव्हीमधल्या सिरीयल बघावं,
मुलांसमोर गप्प बसावं,
नातवंडांशी खेळत रहावं,
समवयस्कांशी बोलत सुटावं,
थोडफार गॉसिपही करावं,
जमेल तेव्हा बाहेरगावी जावं,
एखादं फंक्शन अटेंड करावं,
वेळ मिळेल तेव्हा गाणं गावं,
कंटाळा आला तर झोपून जावं,
छान रंगवावी सुरांची मैफल,
मस्त जमवावी जेवणाची पंगत,
सुरेल जुळवावी गप्पांची संगत,
लुटत रहावी जागण्याची गंमत,
स्वाद घेत, दाद देत,
तृप्त मनात आनंद घेत,
हळूच हसत निघून जावं,
पिकलं पान गळून पडावं गळून पडावं।

# बटाटा

सगळया जगात तू प्रसिद्ध बटाटा कसा करू मी तुला टाटा तुला टाटा,

डाळ भाजी हया मध्ये तुझा वाटा कसा देऊ मी तुला फाटा तुला फाटा,

बाळ तरुण विद्ध सर्वांना आवडतो बटाटा एवढ्या साठी घरात करावा लागतो साठा,

पंजाबी खूप खाती आलू का पराठा कितीही वाढू दे वजनाचा काटा,

स्वस्त मिळाला म्हणून खाण्याचा सपाटा मग डॉक्टर काढतात पेशंटचा काटा,

मुळे खातात आवडीने बटाटा चिप्स मुलांना डॉक्टरची भीती नाही हीच त्यांना टिप्स,

रेल्वेतून जाताना पुरी बरोबर हवा बटाटा ऑफिसच्च्या डब्यातून जातो बरेचदा बटाटा,

लहानपणी खूप खाल्ला बटाट्याचा काचऱ्या, साठी नंतर याच होतात खूप बोचऱ्या,

आलू टिक्की बरोबर पोटात जाते तूप, चाट वाल्याकडे दिसली खावी वाटते खूप,

पाच किलो कांद्याबरोबर फ्री मिळाला पाच किलो बटाटा, आता सांगा मला कसा करू मी बटाटा याला टाटा।

# कोण कुठला तुम्ही

कोण कुठला तुम्ही आणि कोण कुठले आम्ही,

तुमच्या घरात तुम्ही सुखी आमच्या घरात आम्ही सुखी ,काड्या काड्या बोध केली अरगच्च घंटी सारखी,

आपण उडालो तर आपली पिल्लही उडतील,

रिकामी घरटी मग खायला धावतील,

त्याच्यासाठी जपायची बिन नावाची नाती,

रिकाम्या घरट्यात आठवणीच सोबती,

विचारणारे असावा कोणी कशी आहात तुम्ही,

सांगणारे असावे कोणी बरे आहोत आम्ही,

त्याच्यासाठी जपायची ही बिन नावाची नाती,

आपापल्या घरात तुम्ही सुखी आपापल्या घरात आम्ही सुखी ।

# स्वायुष

बाळा जो जो रे,

लाडविला पाळण्यात स्वाती आयुष्य चा बाळा किती दिवस राहणार आहे छोटा किती दिवस चाटणार आहे अशी बोटे,

होरे लोकरी मोठे लवकरी मोठे,

पहावया जग हे किती खरे खोटे,

बाळा जो जो रे,

मोठा होऊन होशील गुड बॉय, आनंदवणी करशील बाय बाय, मामा पाठवेल तुला फॉरेनची टॉय,

बाळा जो जो रे,

दोन दोन नातू आजीची होईल धावपळ तरी होऊन न द्यायची तुमची हाळ,

प्रेमाने करील ती तुमचा सांभाळ,

बाळा जो जो रे,

मोठा होऊनी सर्वांचा ठेवी मान,

तुला लाभेल वैभव सुख समाधान,

आयुष्यमान चा पुत्र तू होशील आयुष्यमान,

बाळा जो जो रे।

# उठाई गीत

बाळा उठ उठ रे लाडीवाडा उठ उठ माझ्या राजस बाळा,,

तुझ्यासाठी आणलाय बेड टी बिस्किटे चार खारी आणि स्वीट,

जायचे कॉलेजला संपली शाळा,

उठ उठ रे माझ्या राजस बाळा,

तू चटकन तयार होईल, नको अंघोळ फुसफुस मारून घेईल, वाजे मोबाईल फोन तुझा येईल,

निळ्या जिंवर घाल रे टी-शर्ट काळा माझ्या राजस बाळा, शोभशील बाईकवर तू , कॉलेज वर मुलींवर मारशील नयनाचे तीर, तुझ्यावर फिरेल मुलींची नजर भिरभिर,

फॅशनेबल तू होईल बाळा,

उठ उठ रे माझ्या राजस बाळा,

नसेल शिक्षण खेद करू नको म्णी, बशशील आपल्या वडिलांच्या तू दुकाने लक्षादिशांच्या मुली सांगून येथील शनि,

मुलीचा असेल रंग जरी सावळा,

उठ उठ रे माझ्या राजस बाळा,

दुकान संभाळ नीट माझ्या बाळा हेराफेरी करून करशील घोटाळा, पैसा जमावशील तू गोरा आणि काळा,

उठ उठ रे माझ्या राजस बाळा उठ रे उठ लाडीवाडा।

# कविता कशी करू मी

कविता कशी करू मी मनावरी हाय तान, थंड झाली लेखणी कसे फेकू शब्द बाण ,
कविता कशी करू मी येईना मला स्फूर्ती ,कौतुक हवे तुझे नको जगत कीर्ती,

कविता कशी करू मी सत्तरी केली पार, वारंवार अडखळले लेखणी, सरस्वती ही घेई माघार,

कविता कशी करू मी कुणी कापले पंख, घेता येईना भरारी धरतीवरच बसला डंक,

कविता कशी करू मी घरातून मिळेना साथ, लेखणी घेताच हाती शब्दा शब्दातून होई वाद,

कविता कशी करू मी हृदय माझे विधीर्ण, सुचेना मज काव्य लेखणीही झाली जीर्ण,

कविता कशी करू मी नको करू मला आग्रह, राहिले कागद कोरे विस्कळीत झाला शब्द संग्रह।

# अरे संसार संसार

अरे संसार संसार नाही तवा गॅसवर भूक लागता खाती मॅगी नको चटकेदार भाकर,

अरे संसार संसार होता खराब मिक्सर लागे जेवण बेचव स्वयंपाकावर होतो असंर,

अरे संसार संसार मिळेना जेव्हा गॅस नको वाटतो स्वयंपाक घ्यावा वाटते गळाफास,

अरे संसार संसार स्वयंपाकाला नाही वेळ जेवणामध्ये खाऊ ब्रेड उपासाला दूध केळ,

अरे संसार संसार महागाईने केला कहर अतिथी येता दारी आठी पडे कपाळावर,

अरे संसार संसार नित्य डोक्याला टेन्शन कशी करू चढाओढ रोज बदले फॅशन,

अरे संसार संसार भेटता म्हणती हाय, पुढे पुढे जाता कोणी मागे ओढताती पाय,

अरे संसार संसार मुले झाली बिझी फार आता दैवत हो त्यांची टीव्ही किंवा व्हीसीआर

अरे संसार संसार कॅसेटवर करीती डिस्को स्वदेशी रमे न मन पाहू वाटे लंडन मास्को,

अरे संसार संसार पैशाचा सारा खेळ पती-पत्नी कमावती परिखर्चाचा नाही मेळ,

अरे संसार संसार बना गांधींचे माकड, कष्टाला घाबरूनी खावे विकतचे पापड,

अरे संसार संसार जणू राक्षसाचे मुख, किती गिळले हो याने धान्य पैसा चैन सुख।

# दुःखाची जात

सासू मेली रडते सून धुरावरती डोळे धरून इकडे तिकडे बघते चोरून कुठे ठेवले गठूळे पुरून,

जाऊ रडते दारा आडून डोळे टिपते मधून मधून कशी करू कामाची वाटणी कुणाशी भांडू जाणून बुजून,

नणंद रडते वरून वरून डोळे पुसते कांगावा करून कुणाच्या काढू कुरापती चाड्या चुगळ्या करू कुठून,

शेजारीन रडते बघून बघून अफसोसाचे कर्तव्य म्हणून गप्पा करायला बरी ही उसण्या पासण्या जाऊ कुठून,

मैत्रीण रडते उदास असून हुंदक्या वरती हुंदके देऊन कितीदा केली मने मोकळी सुख दुःखांच्या गोष्टी करून,

मुलगा रडतो हाताश होऊन रोजची भांडणे गेली संपून अश्रू वाहतील गालावरून पोरका झालो आजपासून,

लेक रडते धाय मोकलून प्रेतावरती पडून पडून माहेर माझे गेले संपून अशी माय मिळेल कुठून,

दीर रडतो विचार करून गेली वहिनी दादाला सोडून कशी करू पुढची व्यवस्था कशी टाकू हिला फुकून,

नवरा रडतो मनापासून अंतरातील कळ दाबून गेली सखी अर्धांगी माझी कसा जगू मी तिच्या वाचून।

# नातं

कुटुंब संस्थेत नात्यांना आहे स्थान त्यामुळे ठेवावा लागतो नात्यांचा मान, एका घरची कन्या सासरी जाऊन होते धन्या अनेक नात्यांना जन्म देऊन बनवते नव्या कहाण्या,

कुणाची पत्नी कुणाची सून कुणाची वहिनी कुणाची काकू प्रश्न पडतो तिला आता कुणापुढे मी वाकू, रक्ताच्या नात्यांमध्ये येते स्वार्थाची बांधिलकी मानलेल्या नात्यात होतो जिव्हाळा आणि आपुलकी,

नात्यामुळे होते दुःख नात्यामुळे होते सुख नात्यामुळे बरेचदा फुटते भांडणाला मुख संसारात राहायचे तर नात्यांना घेऊन चालावं लागतं, सगळ्यांना जुळत घेऊन जीवनाला सुखवावे लागतं,

कुटुंबातल्या नात्यांमध्ये जर तुम्ही झाला फेल जीवनातल्या सुखदुःखाच्या कटू होतो खेळ रक्तांचे नातं असतं जणू गवतांचं पातं हळुवार मनानेच त्याला जपावं लागतं,

नातं बनवू नये कधी अळवावरचं पाणी, जीवनाला त्यामुळे मिळते दुखत कलाटणी आजच्या विभक्त कुटुंबात राहतात फक्त राजाराणी एकट्या आजारी असलो घरात कोणाला मागायचे पानी,

छोट्या कुटुंबात नसतात काका मामा आत्या मावशी असते, प्रतिबिंब आपले तेच दिसते दर दिवशी,

घरट्यातून आपण उडलो तशी आपली पिल्ले ही उडतात, एकटेपणाने रिकामी घरटी मग खायला धावतात, एवढ्यासाठीच जपायची बिन नावांची नाती,

रिकाम्या घरट्यात राहतात आठवणीनीच, सोबती विचारणारा असावा कोणी कसे आहात तुम्ही सांगणारेही असावे कोणी बरे आहोत आम्ही,

म्हणूनच जपायची आपण बिन नावांची नाती एकटेपणाच्या आयुष्यात शेजारीच आपले सोबती।

# नाही व्हायचं मला बारीक

परप्रांतातले लोक म्हणतात तुम्ही दुधा तुपात लोळता, आम्ही त्यांना तात्काळ म्हणून तुम्ही काहो आमच्यावर जळता खात्यापित्या घरच्या आम्ही नाही घालवत घराची

अब्रू म्हणा जाड लठ्ठ कुणी, आम्ही कशाला कुणाला घाबरू,

दिल्लीचे हे सुंदर दूध तूप याची शरीराला आवश्यकता खूप, ड्रायफूट्सचे मनाला मोहविते स्वरूप, भाता पुलावावर तर हवेत तूप, बाजारातील बघुनी पनीर खवा दिसताच वाटतो हवा हवा, हलवायचा सुंदर चविष्ट मावा दोन्ही वेळा चढतो पराठयासाठी तवा,

दिल्लीचा हा प्रसिद्ध बासमती नकळत केव्हा वाढवितो वजनाची गती, उत्तर हिंदुस्थानाची अनंत फळे कशाला खावीत आम्ही कंदमुळे, पिऊन दिल्लीचे बादी पाणी लवकरच फुगते रावांची राणी,जोवर होते ती शहाणी तोवर आली असते आणीबाणी, दिल्लीची ही गुलाबी थंडी का न खावी मटन अंडी, थंडीची ही तेलकट खाणी वाढल्या वजनाची नकोच पाहणी, दिवसे दिवस बघुनी वाढते वजन नाके मुरडतात घरातील प्रियजन, किती प्या लिंबू पाणी लावुण मधाचे बोट वजनात आमच्या कधी नाही येते खोट,

खाउणी मस्त मिठाई मेवा सळपातळाचा का करावा हेवा परमेश्वराचा मानुनी हा ठेवा, मनपसंत आहार घेतच राहावा सांगा बरे कशी मी होऊ बारीक, कालच आणली आहे साखरी खारीक,

मोठ्र्या मुश्किलीने मिळतो मनुष्य जन्म, सोडा डायट खा प्या आणि वहा धन्य।

# बिनधास्त

घराच्या खिडकीमधूनही होते बाहेर पहात, बागेच्या कारंजामध्ये कबुतरे होती नहात, बघता बघता विचार आला मणी काम करायला हे जात का नाहीत,

कोणी पंखाने पाणी उडवीत करिती खेळ आनंदाने घालविती आपला रम्य वेळ,

कधी ना दिसते यांच्या भोवती चिंतेचे वलय धावत जावूनी ना गाठायचे यांना कार्यालय, न फायलीची चिंता न ऑफिसचे टेन्शन नको पुढचे प्रमोशन नको शेवटची पेन्शन,

ना जाऊनी आणिती कधी आपले राशन न एकती कुणाचे गोड कडू भाषण,

करती न कधी आपल्या दुःखाचे प्रदर्शन जेव्हा बघावे तेव्हा देती हसतमुखाने दर्शन, आले हे रिक्त हस्त जातीलही रिक्त हस्त, हेवा वाटे यांचा असे कसे हे बिनधास्त ।

# कसे हो घडले असे

जीवाला वाटतं नव्हते अगदी बरे शत्रू डॉक्टरला शरणे जावे हेच खरे, डॉक्टरच्या हातात दिली जर नाडी तरच सुरळीत चालेल ही जीवन गाडी,

डॉक्टर म्हणाले चिंतेचे आहे कारण खूपच वाढले तुमचे एकाएकी वजन, सोडा आता कॅलरीज आणि मिठाई मेवा उजाडल्याबरोबर चार किलोमीटर धावा,

वाढललेला बघून वजनाचा काटा, आले लक्षात खाण्याला द्यावा लागेल फाटा, शोधाव्या लागतील डायटिंगच्या नव्या वाटा, बऱ्याच गोष्टींना करावा लागेल टाटा,

काय करायचे या वयात रूप ,सोडून देईन मी तेल आणि तूप, मोजून खाईल धान्य व कॅलरीज, अशक्त झाले तर घेईन शकती बेरीज,

सडपातळपणाचे लावीन मी लेबल, नाही पाहणार सोफ्यावर बसून केबल, आहारात योग्य तेच ईटेबल घेईल, व्यायाम करून फिट राहील मी फिजिकल,

एक महिना झाले मी त्रस्त ,वेगवेगळे ज्यूस पिऊन राहिले मस्त ,डायटिंग चे जेवण केले मी फस्त, माझ्याकडून प्रयत्नाची केली शिकास्त,

एक महिन्याने आरशात पाहून झाले चकित ,माझेच मला कळून चुकले ,कठीण भाकीत सडपातळ तर बनयाचे स्वप्न बनले, अतीत कुठलीही गोष्ट राहिली नाही, माझ्या अंकित परत वजन करण्याचे न राहिले भान, आपले आपल्याच वाटू लागले शक्तिमान, फॅमिली डॉक्टर आमचे खूपच आहेत महान, सल्ला घेऊन वेळोवेळी त्यांचा राखीन मी मान।

# पुस्तक

ज्ञान देणारे गुरु असते पुस्तक,
धार्मिक ग्रंथापुढे झुकते मस्तक,
पुस्तकच असते ज्ञान वर्धनाचे हस्तक,
सुसंस्कृत बनवण्यास पुस्तकच देते दस्तक,
पुस्तक सारखा मित्र नाही,
शिक्षण शिवाय गतयंत्र नाही,
बिना पुस्तक व्यक्ती अशिक्षेत राही,
उन्नतीसाठी पुस्तकच असते सही।

# जाऊदे रे जाऊदे कान्हा

तुझ्यासाठी करून या थाट चालू लागता यमुना घाट सर्वासमक्ष आडवीसी वाट जीव होतो रे लाजिरवाना जाऊ दे रे जाऊदे कान्हा

सोडुनिया जनरीती बोलाविते भीती सासुरवाशींनीस मज भीती जन्म जाईल रे दिलवाना जाऊ दे रे जाऊदे कान्हा ननंद आहे कजाक मागोवा घेईल लगोलग करुनी निघाले

रे बहाना कधी होशील तू शहाणा जाऊदे रे जाऊदे कान्हा तुझ्या माझ्या खानाखुणा बघुनी क्रोधेल पती राणा

नको बोलवू पुन्हा पुन्हा जाऊ दे रे जाऊदे कान्हा

चल सत्वरी यमुना पार रस्त्यात अडविले तुझे यार गाव करील रे ठणा बना जाऊ दे रे जाऊ दे कान्हा

घरी आहे कर्मठ सासू डोळ्यातून वहाविते सतत असू किती सोसू रे तुझ्यासाठी यातना जाऊदे रे जाऊदे कान्हा वृत्ती तुझी खोडसाळ रुकविते मजसी मोहना जाऊ देईल की

रे ताना जाऊ दे रे जाऊदे कान्हा

तुझी पुरुषाची रे जात प्रीतीने मजवीवरी केली रे मात सताविती खानदानी घराना जाऊदे रे जाऊदे कान्हा सोड मला रे देवकीनंदन ऐकू येते मजसी रुदन घरी आहे रे बाळ

तानहा जाऊदे रे जाऊदे कान्हा

# आपली आनंदवन सोसायटी

सोसायटी सोसायटी, इथे कौतुकाची 100 घरटी, सोसायटी सोसायटी उभे राहते सुखदुःखाच्या पाठी, सोसायटी सोसायटी येथे नांदती कोकणी अन घाठी, सोसायटी सोसायटी बालकनित पितात मॉर्निंग टी, सोसायटी सोसायटी इथल्या लेकी सुना व्हेरी स्वीटी, सोसायटी सोसायटी येथे रंगतात छानशा किटी, सोसायटी सोसायटी गणपती मध्ये प्रोग्रामची दाटी, सोसायटी सोसायटी हॉलमध्ये होते जेवणासाठी रेटारेटी, सोसायटी सोसायटी ऑफिसमध्ये कामाच्या पैशाच्या वाटाघाटी, सोसायटी सोसायटी हॉलमध्ये होतात मुलांच्या पार्टी, सोसायटी सोसायटी येथे मुलांची चालते अब्बा कुट्टी, सोसायटी सोसायटी इथल्या लॉन्चची सुगंधी माती, सोसायटी सोसायटी मंदिरात देवापुढे खडीसाखरेची वाटी, सोसायटी सोसायटी सात वाजता वाजते मंदिरांची घंटी, सोसायटी सोसायटी येथे झाली स्वस्तात प्रॉपर्टी, सोसायटी सोसायटी इथे होतात मित्र मैत्रिणींच्या भेटीगाठी, सोसायटी सोसायटी साजरी होते 75 अन साठी, सोसायटी सोसायटी आपला तो बाबा दुसऱ्यांची कार्टी, सोसायटी सोसायटी फेब्रुवारीत सजते फुलांची सृष्टी, सोसायटी सोसायटी मुलांना मिळते संस्कारांची घुटटी, सोसायटी सोसायटी पाहुणे करतात कौतुकांची वृष्टी,सोसायटी सोसायटी घराघरातून वाजते कुकर शिट्टी, सोसायटी सोसायटी शत्रूच्या पाठीत घालू काठी, सोसायटी सोसायटी नवीन मॅनेजमेंटच्या नवीन राजवटी, सोसायटी सोसायटी भरून काढते सगळयांच्या त्रुटी, सोसायटी सोसायटी वृद्धांच्या आधाराची भक्कम काठी, सोसायटी सोसायटी सगळ्या सोसायटींची केली सुट्टी, सोसायटी सोसायटी प्रत्येकाने काहीतरी करा हिच्यासाठी, सोसायटी सोसायटी येथे मोकळी मने अणि झाकल्या मुठी।

# पाठवणी

लेक लाडकी आज,गीता ही जाते ग सासरी ,

गीता ही जाते ग सासरी,

दाटुनी येती नयना मधुनी सुखदुःखाच्या सरी,

गीता ही जाते ग सासरी,

विरहाने मन व्याकुल झाले दुःख दाटले,

उरी ज्याचे धन हे त्याला दिघले असे रीत ही खरी,

मान देई तू सासू श्रवशुरा ज्येष्ठ भगिनीला,

थोरांच्या आशीर्वादाने लागू दे समृद्धीला,

अति भाग्याने तुला लाभला सहचर अमित,

क्रीतार्थ झाले मुकुंद वसुधा पाहुनी सौक्यात,

विसरू नको तू कर्तव्याला भूषवी दोन्ही कुला,

कुलस्वामिनी देवी लक्ष्मी सांभाळी तुजला,

लेक लाडकी आज गीता ही जाते ग सासरी,

गीता ही जाती ग सासरी ।

# नेत्याचा पुतळा

चौकातून येताना दिसला नेत्याचा पुतळा, हवेतील धुळीने तो झाला होता काळा काळा, नेत्याने लाविला होता सर्वांना खूप लळा परीकालानतराने तो पण गेला रसा तळा,

उभा राहतो कडक उन्हात पुतळा, पहात राहतो रम्य हिवाळा पावसाळा, बोटे दाखविते लोक पहा मळका पुतळा, निसर्गाची घालीतो नेहमी पुतळ्यांना आंघोळा,

ज्यावरी होती तुमची नितांत निष्ठा का टाकिती पक्षी त्यावरी सतत विशटा का नाही आवरत तुम्ही त्या दुष्टा का नाही पलटत काळ इतिहासाच्या पृष्ठा,

विसरण्या घडलेले आपुली हे पाप, वर्षातून एकदा पुतळा करती साफ, सुटलो म्हणती एक वर्षाचा गेला ताप, हीच राहते मग पुढील नेत्यावर छाप,

कार्याबद्दल नेत्यांच्या मनात खातीखार परिहास्यवदनाने त्यावर चढवीती हार, सत्ता आपुली वाढवण्या पुतळ्याच्या घेती हातभार, सज्जन बनुनी हास्यवंतने नमती वारंवार, पुतळ्याच्या चौथ्यावर बसुनी खाती भेळ, साले टाकुनी तिथेच खाती शेंगा आणि केळ, गप्पाटप्पा निंदा यात घालविती वेळ, कसा लावावा त्यांच्या श्रद्धेचा मेळ,

म्हणूनही पुतळ्याला शोकेसमध्ये उभारा, लोकांनाही सतत स्वच्छ दिसेल तो बरा, कार्याची नेत्यांच्या मुक्त मनाने प्रशंसा करा, त्यांनी दाखविलेला सुपंथ तुम्ही सहर्ष धरा।

# पाठमोरी

बदली झाली आमची अलीगडला दिल्ली सोडताना वाईट वाटले मनाला जावे लागले या पापी पोटा करता कारण जेथे राघव तेथे सीता,

हिंदू कॉलनीत मिळाले घर अजूबाजूचा दिसे सुंदर परिसर घराच्या मागे खूप मोठे मैदान मैदान मागे गच्चीवर एक खानदान गच्चीवर बसे एक तरुणी सुंदरी लांब सडक केस सुकविण्या,

पाठमोरी रविवारी दिसत असे, करीत असावी नोकरी आनंदाने खेळवीत असे गोड छोकरी, गच्चीवरच चाले त्यांचे खानपान येता-जाता दिसे त्यांचे खानदान,

बॉबकट वाली एक दिसे तिची सहेली, ही दिसे पाटमोरी हीच एक पहेली ,बघुनी तिला वाटे पाटमोरी कशी असेल ती, काळी अथवा गोरी, सुंदर भरी दिसे तिचा बांधा चेहरा दिसत नाही हाच एक वांदा,

रविवारी गजबजलेली असे वस्ती आपल्या बाळाबरोबर करिती मस्ती, नवरा म्हणे माझा कर तिच्याशी दोस्ती, मेहुणी मिळेल मला एक सुंदर सस्ती,

केसरी कधी पांढरा, कुर्ता करी परिधान वाटे विचार असतील तिचे महान, बसल्या जागी काम करी लहान सहान, पाहून मला वाटेल समाधान छान, एक रविवारी चमत्कार झाला अरे सुरेंद्र आवाज कानी आला, हाक ठोकताच वळली ती पाठमोरी तिला पाहताच मी झाली गोरीमोरी,

नव्हती ती पाठमोरी होता तो पाठमोरा, हाजी हाजी महनाला सरदार पुत्र तो खरा,

लांब सडक केस सुकविण्या बसे पाठमोरा, आज समोर आला राकट त्याचा चेहरा, बाबकट वाली पत्नी, सुंदर गोडसे बाळ, केस सुख्वित घालवी रविवार सकाळ,

बुद्ध ठरले मी घालविला अमूल्य वेळ, असा संपला रविवारचा सुंदर खेळ।

# आषाढी एकादशी

28 युगे उभे राहिला विटेवरी विठ्ठला आता बसावे क्षणभरी,

उभे विटेवरी कटी दोन्ही हात, कसा सेवीला नाम्याचा भात, भक्ताने घेतली कसोटी बरी विठ्ठला आता बसावे,

क्षणभरी पुंडलिका सह मायबाप गेले वरती, तुम्ही तरी तसेच उभे विटेवरी, उभ्या उभ्या झोप घेतली युगांतरी, विठ्ठला आता बसावे क्षणभरी, कधी भक्तांना लागेल मदत वीट

सोडूनी तेव्हा यावे हो धावत, कृपा करा एवढी भक्तांवरी,

विठ्ठला आता बसावे क्षणभरी

इतके महान संत ते झाले ,बसा म्हणायचे कुणा न सुचले, शूद्र जीवांची विनंती एकूण तरी विठ्ठला आता बसावे क्षणभरी।

# वार्धक्याची काठी

झाली साठी झाली साठी हातात आली वार्धक्याची काठी,

साठी होताच नोकरीतून होते निवृत्ती, घरात होते अडगळ सर्वांची, बदलते कृती तरुणांचा होतो उदो उदो, वृद्धांची होत नाही पर्वा,

तरुणांना मिळतात गुलाब, वृद्धांना सुकलेल्या दुर्वा, आपण झालो बेकार मन न्यूनगंडाने पछाडते, हळूहळू आपल्याकडे बघण्याची दृष्टीच बदलते,

कर्तव्य म्हणून वरून वरून करतात आदर, मागून करतात आपल्या तक्रारी सादर,

दहा मुले झाली तरी त्यांना पळताना वाटते गोड, पण दोन आईबाप म्हातारपणी होतात जड,

साठी येतात सुरू होतात डॉक्टरच्या फेऱ्या पेन्शनरांच्या च्या असतात एक सारख्या तक्रारी साऱ्या,

चढत्या सूर्यालाच होतो जगाचा नमस्कार, मावळत्या सूर्याची किरणे असताला जातात पार,

वृद्धांना पाहून कल्पना करत नाहीत तरुण, सर्वांनाच जायचे असते या स्थितीतून,

काळ कोणाला सोडत नाही सर्वावर पाडतो प्रभाव, सांभाळून घ्यावे वृद्धांना ज्याचा दिसतो अभाव,

वृद्धांच्या मनापासून जे ठेवतील मान, त्यांचेच म्हातारपण जाईल सुखी छान,

आज तुम्ही सर्वजण वृद्धांची कराल सेवा उद्या तुम्हालाही मिळेल तुमच्या मुलांकडून मेवा,

तरुणांचे व वृद्धांचे एकमेकांशिवाय नाही भागत, म्हणूनच सर्वांनी आनंदाने करावे वृद्धांचे स्वागत,

आज जर तुम्ही बनाल वृद्धांची काठी उद्या निश्चितच सुंदर होईल तुमची साठी ।

# बायकांचे डायटिंग

फ्रीजचे उघडताच हळूहळू दार दिसला ताज्या लोणच्याचा खार मला दिला आहे डायटिंगचा सल्ला म्हणून ब्रेड बरोबर थोडासाच खाल्ला एवढ्याने काही होत नाही,

मोलकर्णीने दुधाचे पातेले मागितले रिकामे करून रोजच्या सवयीचा परिणाम दिले झाले चाटून पुसून एवढं तर डायटिंगला चालतं ,भाताच्या पातेल्याला लागली तांबूस

सुंदर खरपुडी डायटिंग गेले विसरून मनाने एकदम घेतली उडी एवढं तर डायटिंगला चालतं, राजूला भरवताना उरला चांगला ताटलीभर भात नेहमीच्या सवयीने गेला

तोंडाकडे चटकन हात एवढ्याने तर काही होत नाही, पाहुणे येणार म्हणून भाजी आमटीची पहिलीच चव, येता जाता तोंडात टाकला दाणे आणि नारळाचा खव एवढ्याने तर काही होत नाही, अंदाज चुकला थोडा जास्त झाला स्वयंपाक उरलेसुरले खाऊन वर वाटीभर प्यायले ताक एवढ्याने तर काही होत नाही, डायटिंग चा केला स्वयंपाक कॅलरीज मोजून थाळीभर घेतला वाढून खाल्ला चांगला चापून चोपून एवढ्याने तर काही होत नाही।

# काव्यांगण

कविता नवी सुचते का बघते मनाला स्वतःच्या ,रुचते का बघते विषय एखादा,

मिळतो का बघते कविता रचायचा छंद,जोपासून बघते अशी कशी ही कविता मला त्रस्त करते,विषय जेव्हा मिळतो मनाला मस्त करते ,

आठवणी बालपणीच्या रम्य लिहिता मन का हुळ हुळते ,

आठवणी तारूनयाच्या रम्य लिहिता रक्त का सळसळते,

आयुष्य म्हणजे सुख दुःखांचा जणू जुगार, सुख भोगता भोगता दुःखांचा अचानक वार,

कविता जुळवत जुळवतच आयुष्य केले पार कवितेमुळेच मिळाला सुखाचा बहार, कविता सुखा दुःखात होते आपली सखी कवितेच्या छंदामुळे न राहती कुणी दुखी,

सुखा दुःखाच्या आठवणी कवितेचा आधार कवितेतच रमत मन होते सुखी फार,

विनंती तुम्हाला माझी सोडू नका काव्यांगण एकत्र बसूनही सगळे कविता ऐकू आपण या काव्यांगणात पडू दे कवितांचा सडा, कवींना असतोच की कवितेचा ओढा ,

किती छान आहे आपले काव्यांगण कवी कवईत्रीच वाटे जणू माहेरचे अंगण,

नवोदित कवीचं दिसतंय हळवं इमोशन, जुन्या कवीचं होत जात आपोआप प्रमोशन,

स्पीकर हॉलमध्ये जमती सगळे एकत्र कवितांचा आपल्या सुगंध पसरवती सर्वत्र,

कविता म्हणती रसाळ वाणी अपुले अपुले प्रभावित करिती जना टाकून कवितामंत्र,

कविता काही मनमुराद हसवून जाती एकूण,एखादी डोळयातून अश्रू येती,

ग्रहण कविता कोणाच्या डोक्यावरून जाती परिसंयोजक सारे सर्व सांभाळूनी घेती,

कविता आपुली हिंडते जागतिक आस्वाद घेती ,

मनापासुनी रसिक दिल्लीकरांचे होते इथे तिथे कवतिक, टीकाकारांचे लेखणी सरसावती लवचिक,

नशिबाने आहे हे सहस्त्रक साल करुनी जातील कविता आपल्या मालामाल,

सुरेल कविता आपल्या धरतील ठेका ताल, पुढच्या वर्षी नक्की तुम्ही पुन्हा इथे याल।

# नव न्यारे नवन्यारे

तुला नको आई तुला हवी सासू डोळ्यांमध्ये माझ्या पुसलेल रे असू,

तुला नको बाप तुला हवा सासरा आपल्या संसारात त्यांचाच आसरा,

तुला नको बहीण तुला हवी सालि बनेल ती तुझी आधी घरवाली,

तुला नको भाऊ तुला हवा साला आपल्या संसारात त्याचाच बोलबाला,

तुला नको वहिनी तुला हवी भाभी स्वयंपाकघरची तिच्याजवळ चावी,

तुला नको मित्र तुला हवी सहेली आपल्या संभाराची सोडवेल पहेली।

# सात वऱ्हाडी आणि एक कऱ्हाडी

ओट्यावरती जमले आमच्या सात वऱ्हाडी,
केविलवाणी मी एकटी त्यांच्यामध्ये कऱ्हाडी,
वर्हाडाणी दिली देशाला आंबट गोड संत्री,
सातारा कऱ्हाडून आले अनेक खमंग मंत्री,
वरहाडयांना आवडते तेल आणि तिखट,
कऱ्हाडी पक्के असती देण्या घेण्या चिकट,
आवडीने खातात नागपुरी पुडाची वडी,
देशाबाहेर जाते सांगलीच्या चितळ्यांची बाकरवडी,
नागपुरी खाती चिवडा आणि जिलेबी चे वेडे ,
खाबुनी पहा सातारी कंदी पेढे,
भारतभर खपते कोल्हापुरी संकेश्वरी मिरची,
वऱ्हाडी कऱ्हाडी सोडाव्या तयार नसती खुर्ची,
वर्हाडी राहती संतुष्ट आहे वऱ्हाड संपन्न महान,
कऱ्हाडी झिजवत राहती आपली कोल्हापुरी वाहन,
नागपुरी असती रसिक जणू संगीताची छावणी,
या भाऊजी बसा भावजी अशी आहे सातारी लावणी,
तिखट वरती गोड , घोडावरती हवे तिखट
म्हणून वऱ्हाड कराडाचे आहे पक्क मेतकूट
एकटी मी कऱ्हाडी सात वऱ्हाडयांचा जोर,
पण सिंह वनात एकटा तरी तोच तर थोर।

# माझी फॅमिली

बाबा माझे गोरेपान आई माझी सुंदर छान,

आई बाबा ऑफिसला जातात येताना माझ्यासाठी चॉकलेट आणतात,

आजीची माझ्या वाकली पाठ त्यामुळे ती चालत नाही ताट,

सोफ्यात बसून टीव्ही पाहते तिथून सर्वांवर नजर ठेवते,

आई-बाबांची कामाची गडबड आजीची आपली नुसती बडबड,

आजीची कायम चालते पडधड, काकांची त्यामुळे होते तडतड,

काका माझा मोठा महान माझ्याशी खेळताना होतो लहान, मला छानशा गोष्टी सांगतो माझे लाड कौतुक पुरवतो,

आत्या माझी राहते नाशिक फेरी असते तिची वार्षिक,

आतल्या फिरायला फार आवडते दिल्लीची चाट ती खातच राहते,

लखनऊ होऊन माझी नानी येते खूप खाऊ खेळणी आणते मला छान छान गोष्टी शिकवते माझे खूप कौतुक करते,

मामा माझा खूपच गमतीदार हसून हसून करतो बेजार,

घरात मी सर्वात छोटी काका, मामा हाऊस पुरवतात मोठी

अशी माझी फॅमिली छोटी, दृष्ट नका लावू खोटी।

# नमो नमः

दीड महिन्याच्या धावपळीनंतर संपली एकदाची वादावादी अर्थात सातत्याने प्रचार करून नरेंद्र मोदीने मिळवली राजगादी, थकले मोदी सुटले एकदाचे इलेक्शन बूथ

सोडा चहा आता घ्या केशर बदाम दूध,

दूध पिताना घ्या बरोबर आपली मित्रमंडळी रात्र दिवस ज्यांनी मदत केली वेळोवेळी, आता सजला बीजेपी चा रम्य दरबार कारण निवडून आले त्यांचे मोदी सरकार,

जिकडे तिकडे होईल आता मोदींचा सत्कार लोकांना आहे विश्वास मोदी करतील चमत्कार,

वर्तमानपत्र टीव्ही जिकडे पाहावे तिकडे मोदी राजीवच्या प्रियांकालाही घेतले होते गोदी,

सतत दीड महिना केला उत्तम प्रचार त्यातूनच कळते तुमचे सुंदर विचार,

गुजरात सारखा मिळू दे प्रत्येकाला कामधंदा, रामराज्य करा तुम्ही सुखी होऊ दे हर एक बंदा,

तुम्हाला मिळाली आहे सुंदर संधी आणि सत्ता प्रत्येक नागरिकाला मिळू दे योग्य भत्ता,

तुम्ही कराल देशाचा सुंदर विकास प्रत्येक नागरिकाला आता तुमचा विश्वास तुम्हाला मिळाली आहे योग्य सुवर्णसंधी कुठल्याही बाबतीत न घडो कुठलीही मंदी,

या चहावाल्याची झाली असंख्य चाहते जनता ही त्यांना खूप कौतुकाने पाहते,

कार्यकर्ते आहेत तुमच्या इद गिद नक्कीच सफल करतील तुमची कारकीर्द,

मोदीजी तुम्हाला होती सिंहासनाची आस त्यासाठी तुम्ही केलेस प्रयास मनसारखे तुम्ही सिंहासना ही मिळवलेत खास,

स्वर्गाचे राज्य चालवितो देवांचा राजा इंद्र भारताचे राज्य चालवणार आता मोदी नरेंद्र,

तुम्हाला आहेत मनापासून जनतेचे आशीर्वाद देशाच्या उद्धार कराल तुम्ही यात नाही वाद।

# गॅस साठी डायटिंग

हल्ली हल्ली खूपच होतो गॅसचा त्रास कंटाळा न करता गाठला डॉक्टरचा निवास, म्हणाले डॉक्टर औषध पथ्याने संपेल त्रास गॅस वरचे औषध ही देतो तुम्हाला खास, हेवी खाऊ नका फार पचनक्रियेला नका देऊ भार तासा तासाने खा थोडे थोडे बदला रोजचा आहार,

डॉक्टरला मी मानते आपला गुरु तासा तासाने डायटिंग केले सुरू,

घड्याळात वाजले सात मारीची दोन बिस्किटे बुडवली चहात,

घड्याळात वाजले आठ एक बेसन लाडू ची लावली वाट,

घड्याळात वाजले नऊ म्हटले थोडेसे फरसाण खाऊ,

घड्याळात वाजले दहा चीज टोस्ट खाल्ला पहा,

घडायलाच वाजले 11 चटणी बरोबर खाल्ला खाकरा,

घड्याळात वाजले बारा दही बरोबर खाल्ला पराठा खारा,

घड्याळात वाजला एक स्वीट डिश बरोबर खाल्ला केक,

घड्याळात वाजले दोन टीव्ही पाहताना खाल्ला आईस्क्रीमचा कोण,

घड्याळात वाजले तीन मुलांबरोबर थोडे खाल्ले चाऊमीन,

घड्याळात वाजले चार मठ्ठी बरोबर खाल्ला लोणच्याचा खार,

घड्याळात वाजले पाच प्यायले ग्लासभर गोड छाछ,

घड्याळात वाजले सहा चिवड्याबरोबर घेतला चहा,

घड्याळात वाजले सात कुकरमधून काढला वरण-भात,

घड्याळात वाजले आठ भाजी पोळीची पडली गाठ,

घड्याळात वाजले नऊ आरामात थोडीशी फळे खाऊ,

घड्याळात वाजले दहा तोंडात टाकली कॅडबरी पहा,

घड्याळात वाजले ११ ड्रायफूट खात मारल्या चक्रा,

घड्याळात वाजले बारा सटरफटर खात खाल्ला वारा,

दुसऱ्या दिवशी पोटात खूपच दुखले पोटावर हात ठेवून दिवसभर वाकले,

दिवसभर झाले बेचेन हाश हुश तासा तासाच्या डायटिंगला केले मी भलतेच पुश ।

# पारिजातक

अशा जागी लावत तू पारिजातक फुले फक्त तुझ्याच अंगणात पडतील,
जर ती शेजारणीच्या अंगणात पडली तर तुझ्या सुंदर नेत्रातून अश्रू झरतील,
आजूबाजूच्या लोकांनी अन तुझ्या शेजारणीने कितीही ठेवू दे पहारा खडा,
जोरजोरात पारिजात हलवतात तुझ्या डोक्यावर पडू दे सडा,
दरवर्षी ठराविक वेळीच येतो असा पारिजातकाला मंद सुवासिक बहर,
भल्या पहाटे उठून प्रसन्न वजनाने फुले वेचिता तू नको करूस कोणाची कदर,
सुंदर सुवासिक अन दाट फुलांसाठी रात्रीच पसरून ठेव तु शुभ्र चादर,
सकाळी पूजा करणाऱ्या आदी सुंदरशा मोहक परडीतून फुले कर सादर।

# शीतयुद्ध

पती - अगं इकडे ये ऐक माझे सोडूनी दे कवितेचे खूळ,
पत्नी- थांबा हो जरा शांत रहा शोधते आहे ऋषीचे कुळ,
पती -अगं दिसेना तुला का फर्निचर वरची धूळ,
पत्नी- अहो एलर्जी मला धुळीची नका देऊ सफाईला तूळ,
पती- अगं कागद पेन्सिल ठेव बाजूला घरात नाही पाणी,
पत्नी-आणते हो थांबा जरा अर्धी राहील माझी कहाणी,
पती- अगं लक्ष कुठे तुझे केव्हाची तुला मारतोय हाक,
पत्नी- लिंक नका तोडू माझी सुचले आहे सुंदर कथानक,
पती- अगं बहरी झालीस का तू मुले करतायेत भूक भूक,
पत्नी- मध्ये नका हो बोलू कथेत माझ्या होईल चूक,
पती - अगं पाहुणे यायचे घरी कधी होणार तुझा स्वयंपाक,
पत्नी- माझा मी कसाही करीन नका दाखवू तुम्ही धाक,
पती- लग्न करून तुझ्याशी मजला झाला लिखाणाचा ताप,
पत्नी- सात जन्मांची संगत आपुली नका करू पश्चाताप,
पत्नी- सारखी कटकट करता तुम्ही जाईन मी हरिद्वारी,
पती- नको नको ग तू जाऊ राणी कविता करत रहा घरी।

# वर संशोधन

मम्मी- सायली आता तू झाली उपवर तुझ्यासाठी शोधावा म्हणते वर ,कसा नवरा हवा माझ्या छकुलीला तसाच छान शोधून देईल तुला,

मम्मी- डॉक्टर नवरा हवा का तुला मान सन्मान लाभेल तुला,

सायली- दिवस रात्र औषध गोळ्या मलम इंजेक्शनची सुई हातात कायम टोचून टोचून मारेल मला असला नवरा नको ग मला,

मम्मी- तुला हवा का नवरा इंजिनियर उज्वल असते व त्याचे करिअर,

सायली- सिमेंट विटा तो रमून जाईल वाट त्याची मी पाहत राहील दमून भागून करेल कटकट सहन करावी लागेल वटवट,

मम्मी- मग पाहू का एखादा बिजनेस वाला येता जाता दुनिया सलाम करेल त्याला,

सायली- पैशाच्या पाठी लागून तो राहील बिझी त्याची माझी गाठ पडणार नाही इझी, मिळणार नाही कधीच फॅमिली लाईफ अशा माणसाची कशी मी बनू वाइफ,

मम्मी- तुला देऊ का एखाद्या कवी लेखकाला पार नाही राहणार तुझ्या कौतुकाला,

सायली- सारखा हातात घेऊन बसेल कलम आणणार नाही कधी साडी तलम, दरिद्रता त्याच्या घरात झाके, रोज रोज मला पडतील फाके,

मम्मी- मग हवं तरी कसला नवरा तुला तुझ्या मनात कुणी असेल तर सांग मला.

लाजलाजुनी बोलली सायली मम्मी मज आवडतो अक्षय कुमार त्यापुडी सगळे वाटती मज सुमार,

मम्मी करून दे त्याबरोबर माझे लग्न त्याच्या संसारात मनापासून होईल मग्न,

लेकीचे बघून अक्षय कुमार चे वेड मातेच्या मस्तकात चढली तेड,

एक सणसणीत दिली लगावून रडत सायली बसली रागावून,

मग पुढे काय झाले

मातापित्याने केले हितगुज जनता जनार्दन ची राखुनी बुज,

लवकरच हिला टाकू उजवून गंगा न्यायला मग जाऊ आवर्जून ,

माता-पित्याने शोधीला उत्तम सुयोग वर सायली बिचारी मुकाट्याने उभी स्टेजवर , मातापित्याने शोधलेला वराशी तिचे झाले लग्न विसरून अक्षय कुमारला सायली संसारात झाली मग्न,

काही काळ गेल्यावर सायली हसत हसत मम्मीला म्हणाली, मम्मी तू वेळेवर सावरलेस मला किती किती धन्यवाद देऊ तुला।

# अन्न हे पूर्णब्रह्म

जेवणाची पंगत बसली होती वजनी कवळ घेता सुरू झाले, शेवटी अन्न हे पूर्णब्रह्म म्हणून सगळ्यांनी जेवायला सुरुवात केली, मी विचार करू लागले की अण्णाला का म्हणत,

असतील पूर्णब्रह्म, संतांनी म्हटले आहे की अन्नासाठी दाही दिशा फिरवेसी भगवंता या पापी पोटासाठीच माणसांना अपार कष्ट करावे लागतात, आपले भोजन हे शटर्सानी बनले आहे म्हणजे कडू गोड आंबट तिखट खारट व तुरट दिवसभर फराळ खाऊन उपास केला तरी पोळी भाजी वरण-भात खाऊन जे समाधान मिळते ते वेगळेच,

सर्व जातीचे लोक आपल्या आवडीने जेवण बनवतात बहुतेक जिथे जे पिकते तिथे त्याचा वापर जेवनात केला जातो, भोजन हा शरीर धर्म आहे अन्नाशिवाय माणूस जगू शकत नाही, आज काळ आपल्या आहारात खूप प्रकारची विविधता आली आहे टीव्हीच्या प्रत्येक चॅनेलवर कुकरी शो सुरू असतात,

आपले काम काढून घेण्यासाठी मोठे मोठे ऑफिसर जेवणाच्या पार्ट्या देतात परमेश्वरा लाही खुश करण्यासाठी अनेक पक्वानाचे नैवेद्य दाखवले जातात कोणालाही जिंकायचे मार्ग त्याच्या पोटातून जातात,

आजकालच्या वाढत्या महागाईत चारीठाव स्वयंपाक करणे सुगरणीनला कठीण झाले आहे,

पूर्वी अतिथी देवो भव म्हणणाऱ्यांना अतिथी येता कळल्यावर अश्रू पडू लागतात घरची ग्रहणी ऑफिसला जात असल्याने मेडच्या हाताचे बेचव जेवण जेवावे लागत आहे,

थोड्या दिवसापूर्वी मुंबईला गेले होते वहिनी आपल्या माहेरी कोकणात निघाली होती मलाही बरोबर चला म्हणाली, अलिबागच्या जवळच्या खेड्यात जायचे होते

गाडीतून जाताना बाहेर हिरवेगार कोकण पाहून नेत्र तृप्त झाले,

नऊ वाजता एका बैठया घराजवळ गाडी थांबली अंगणात बऱ्याच तरयाची फुलं व भाज्या लावल्या होत्या,

हात पाय धुऊन जेवण घरात आलो केळीच्या पानावर मऊ भाताची मोद त्यावर मेतकूट व साजूक तूप लिंबाचे लोणचे पोह्याचे पापड असा नाश्ता होता, सतत उपमा व पोहे खाणाऱ्या आम्हाला छान वाटले,

नंतर त्यांनी आम्हाला घरा मागची नारळ सुपारी आंबा फणस काजू कोकम केळी झाडे दाखवली एक वाजता पान मांडली, वाढलेली पान पाहून नेतृ तृप्त झाले म्हणताना माणूस आधी डोळ्यांनी जेवतो नंतर तोंडाने ,हिरव्यागार केळीच्या पानावर पांढराशुभ्र भात वाफा निघणारी सोळकडीची वाटी,वालाचे बिरडे ओल्या काजूची उसळ पातळ तांदुळाची भाकर आणि आमरसाची वाटी, कोकणात बारा महिने आमरस मिळतो ,

तृप्त जेवण करून सुखावलो पण गप्पा काही संपत नव्हत्या लोणचं चटणी पदार्थ यावरच गप्पा मारत होतो एका गोऱ्या बहिणी मी आवळ्याची सुपारी दिली तिथल्या सगळ्याच बायका गोऱ्या चिट्ट होत्या काजूची उसळ खाऊन तर कोकणात गोरे होत असतील का, होण्याच्या पानाची भजी व अळूवडी चहा बरोबर खाऊन मुंबईला यायला निघालो,

वहिनीच्या आईने आंबा पोळी फणस पोळी काजू आमसुले कोकम सरबत पोह्याचे पापड बरोबर दिले पूर्ती डिक्की भरून गेली,

कोकणाच सगळं वर्णन लिहायचं कारण की अन्न हे कसे परब्रम्ह आहे व तसेच ते इतर प्रांतांलाही आहे हे सांगायचे होते,

अन्न हे औषधही आहे हळद तर आपण जखमेवर लावतो हळदीचे दूध प्यायची पद्धत बऱ्याच घरात आहे, पोटात दुखवले तर आपण ओवा खातो ओवा हा क्रिमीनाशक आहे, पोटात गॅस झाला तरी ओवा खातात धने जिरे बडीशेप हिंग कढीपत्ता हे सुद्धा वात शरक आहेत ,

मेथी म्हणजे मधुमेहाचे औषध ,कडू कारले अनेक रोगावर औषध आहे, आल्याचे गुणधर्म तर अनेक आहेत, आज नुसत्या विटामिन वर शरीर चालत नाही तर पोट साफ होण्यासाठी फायबरची आवश्यकता आहे ,म्हणून लोक सालीचा उपयोग करायला लागलेत दोडका घोसाळी दुधी भोपळा लाल भोपळा यांच्या सालीची चटणी करतात, तसेच बदाम व शेंगदाणे सालीसकट खातात कलिंगड केळीच्या सालांची भाजी व चटणी करतात, चिकू कैरी सफरचंद सालीसकट खातात लिहायचं उद्देश हाच होता की

मला वाटले, म्हणूनच अन्न हेच पूर्णब्रह्म असे म्हणत असतील, माझ्या अल्प बुद्धीला जे वाटले व भावले त्याचा उल्लेख केला आहे ,आपले आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी त्याचा उपयोग करावा।

# अश्विन शुक्र पौर्णिमा

अश्विन शुक्र पोर्णिमा म्हणजे नवा न प्राशन करण्याचा दिवस, शेतात आलेले नवीन पिकाचा अन्नप्राशन करण्याचा हा दिवस, या दिवशी लक्ष्मी व इंद्र ऐरावत यांची पूजा करतात ,घरातील सर्व मंडळी रात्री बारा वाजेपर्यंत जागरण करून चंद्राला अटवलेले दुधाचा नैवेद्य दाखवून दूध प्राशन करतात, मनोरंजनासाठी विविध प्रोग्राम करतात,

या दिवशी कोण जागृती म्हणे कोण जागे आहे हे लक्ष्मी पाहत असते, चंद्र प्रकाशात आयुर्वेदिक शक्ती आहे त्यामध्ये हे आटवलेले दूध आरोग्य वापी आहे,

या दिवशी सगळ्यात मोठा मुलगा किंवा मुलगी यांची अश्विनी करतात मुलाला तेल लावून नहायला घालतात व गोड पदार्थ खायला घालून चंद्राला देवाला व मुलाला ओवाळतात मुलांना नवीन कपडे किंवा पैसे देतात।

# कुठल्या घरात काय

एक नंबर मध्ये शिजतोय खमंग मसाले भात त्याचा सुवास घुसतोय जाणारे येणाऱ्या च्या नाकात,

तीन नंबर मध्ये बनते ज्वारीची भाकर रामदेव चा दलिया योगाने व डायट मुळे छान राहतो हुलिया,

चार नंबर मध्ये उठल्या बरोबर फुटतो नारळ आमटी भाजी बिरडे याला खातात सरळ,

पाच नंबर मध्ये आवडते डोसा खिचडी तोंडी लावायला असतात अनेक पचडी,

सहा नंबर मध्ये बॅलेन्स डाएट बरोबर का चकत्या रोगावर उपचाराच्या माहित आहेत युक्त्या,

नऊ नंबर मध्ये बनते वालाचे बिरडे,

तेरा नंबर मध्ये पडले तव्यावर बेसनाचे धिरडे,

19 मध्ये वाल्यांचा तुम्ही खाऊन पहा उपमा तुलना कराल तुम्ही कसा बनतो अपला

24 मध्ये बनतात पदार्थ नाना पैसे घेऊन जा आणि पिशवीतून आणा,

25 मध्ये अलहाबादी कचोरी व पुरी ,मुंजे वाहिनी चालवतात कोशिंबिरी साठी सुरी,

30 मध्ये शिजते वेगवेगळे मद्रासी भात गणपतीच्या प्रसादात खाल्ले जातात घरो घरात

34 मध्ये बनतात कोथिंबीर च्या वड्या कधी कधी खाऊ घालते थोड्या थोड्या,

मधुलिकाला आवडते खमंग हिंगाची फोडणी येता जाता चालू असते भाज्यांची तोडणी,

37 मध्ये बनतात दडपे पोहे आहे लुटलुटीत पण हाताला चव आहे,

38 मध्ये बनतात खुसखुशीत चटणी व मसाले प्रशंसा करतात जे खाऊन गेले,

40 मध्ये आवडते आमसुलाची आमटी सीमा शिकवून गेली आपल्या घरासाठी,

41 मध्ये आवडते पावभाजी पण पाहिजे एकदम ताजी ताजी,

44 मध्ये बनते डोसा इडली भात व सांबार त्यांचं बाई रोज तोच आहे तो आहार,

45 मध्ये बनतो लाडू चिवडा कधीही जा तुम्हाला मिळेल तेव्हाच,

कोकजे व परांजपरे कडे बनतात बागेतील होणाऱ्या शेंगा मागायला जाल चार दाखवतील ठेंगा,

57 मध्ये बनतो कढईभर चिवडा खा जयाला पाहिजे तेवढा,

ओसवाल कडे बनते खांडवी ढोकळा आणि दाल बाटी पण बनते फक्त घरच्यासाठी,

इनामदाराकडे बनते उपमा खमंग थालीपीठ थकून आलेल्या चंद्राला स्वयंपाकाची किटकॅट,

सुलभा कडे बनतात गोड पाकातले चिरोटे खाऊन तृप्त होतात मैत्रिणी व जावई फाटे,

गोडबोल्यांकडे होतात दहिवडे नीलम बनवतील छानच गडे,

मुळ्यांकडे बनतो नांदेड खाना पाहुणे तृप्त होऊन घेतात खाना, कधी कधी धपाटे पाठवतात मुळे,

अनघाला आवडतात फळेच फळे ,

निरजा बनवते सगळया प्रकारचा हलवा प्रसाद बनवायचा असेल तर निरजा ला बोलवा,

71 मध्ये आवडते पनीरच पनीर रसमलाई खाणारा बाळ सात्विक अधीर,

वैद्याची शिल्पा बनवते तिखट आणि गोड पण स्वतः मात्र सळसळी व रोड,

रश्मी बनवते गुजराती मोहन थाळ आवडीने खातो मंदार सात्विक बाळ,

76 मध्ये बनत खुसखुशीत पकोडे त्यांच्या प्रकारे बनवतात थोडे थोडे,

77 मध्ये काहीच बाई बनत नाही ज्याला जे आवडतं तेच फक्त खपत्,

78 मध्ये चालू असतं ओव्हन केक बिस्किटे यांचा बारा महिने सीजन,

80 मध्ये बनते टेस्टी टेस्टी गव्हाची खीर भक्तजन प्रसादासाठी राहतात अधीर,

81 मध्ये बनवतो छान छान ढोकळा सासु सुनेचा स्वयंपाक फारच मोकळा,

82 मध्ये बनते करंजी व वाटली डाळ पदार्थांची रेलचेल स्वयंपाकाचा सकाळ,

85 मध्ये बनते चकली व कडी गोळे खानदेशी नाना पदार्थ व गोड गुरुळे,

86 मध्ये बनतो काकडीचा कोरस मऊ मऊ पोळी बरोबर मिरच्यांचा खर्डा,

88 मध्ये बनतो खमंग बेसनाचा लाडू पण कमलताई म्हणतात प्रथमेशला वाढू,

86 मध्ये करतात पंचामृत आणि बरीच लोणची तोंडाला सुटेल पाणी खाऊन,

९१ मध्ये गुरुवारी असते भाकर आणि पिठलं किती खाल तरी मन नाही भरलं,

92 मध्ये असते वरण-भात भाकर भाजी आणि जिलेबी सर्वांना आवडते अशी,

शशीला आहे खाऊ घालण्याची अवड बाजारामधून येऊन काढते ती सवड,

उषा अशा बनवतात नारळाची बर्फी आणि डाळ गणपतीला घालतात विसर्जनासाठी माळ,

शंभर मध्ये बनते रुचकर ज्वारीची आंबील गौरी दर्शनाला आलेले खाऊन तृप्त होतील।

# आनंद वनाचे देऊळ

आनंदवनात फिरत असताना शेजारच्या प्लॉटमध्ये एक छोटेसे मंदिर दिसले, पाच-सहा माणसे काळी मा ची पूजा करत होते आम्ही मैत्रिणींनी बाहेरून जाऊन दर्शन घेतले,

व तेव्हापासून आपलेही एक मंदिर बंगालयां सारखे असावे असे वाटू लागले, तेव्हा सोसायटीतल्या काही करता धरता लोकांनी मनावर घेऊन एक छोटेसे हनुमान मंदिराची प्रतिष्ठापना केली ,आनंद वनातल्या लोकांबरोबर बाहेरचे लोकही दर्शन घेण्यास येऊ लागले, कंपामधून एक छोटा रस्ता देवळासाठी काढला, काही लोक शनिवारी मारुतीवर तेल घालू लागले व काही नारळ फोडू लागले, पुढे बंगालयांनी वर्गणी गोळा करून महादेवाची व काळी मातेची मोठे मंदिर बांधले, आपल्याकडील काही लोकांनी मंदिर मोठे करायचे ठरवले, सोसायटीने गणेश मूर्ती आणली त्याचबरोबर गोखल्यांनी गजानन महाराज व ओस्वालांनी साईबाबा यांच्या मूर्ती आणल्या, मोठ्या प्रमाणावर

प्रतिष्ठापनेचा कार्यक्रम झाला ,असे हे आनंदवनाचे देऊळ तयार झाले मोठा हवनानचा सोहळा झाला, जी भजने घरात होत होती ती आता देवळात होऊ लागली 19 फरवरी

हा देवळाचा वर्धापन दिवस म्हणून साजरा होऊ लागला, राम जन्म कृष्णजन्म व दोन्ही मोठ्या एकादशहा महाशिवरात्र यांची भजने रंगू लागली, रोज सकाळ व संध्याकाळ मंदिरात आरती होऊ लागली, सुरुवातीला मंदिराच्या आरतीची जबाबदारी गवांदे ओसवाल गोडबोले तामाने यांनी घेतली, मंदिराची पूजा भाऊ डोंगरे होते तोपर्यंत सकाळ संध्याकाळ करीत असे भाऊंनी देवळाला नियमित सेवा दिली तसेच जोशी यांनीही देवासाठी नियमित वेळ काढला,

त्यानंतर आता पानसे विघे यांनी मंदिराची जबाबदारी स्वीकारली, आनंद वनात भजनी मंडळ सुरू झाले घरोघरी होणारी भजने आता मंदिरात होऊ लागली ,श्रीमती

सुनंदा जोशी व मनीषा छत्रे यांनी केलेली पुढाकाराची जबाबदारी त्या अजून पार पाडत आहे ,भजनी मंडळातून हळूहळू सदस्य कमी व्हायला लागले सदस्य आता कमी

झाले वया मनाने जास्त धावपळ करणे अशक्य होऊ लागले, हे पाहता काही उत्सुक तरुणी पुढे आल्या सौ ज्योती डोंगरे हिने भजनी मंडळाचा वारसा चालविण्यासाठी

दहा-पंधरा स्वयंसेवक तरुणींना एकत्र करून पुन्हा नव्याने ते भजनी मंडळ सुरू केले, आता त्यांचा संघ खूपच सुंदर भजनांचा कार्यक्रम करतात जुनी आणि नवीन भजने म्हणतात यांचे कौतुक करावे तेवढेच थोडे,आपल्या देवळात दोन मुंजी दोन लग्न कविताचे प्रोग्राम व राम नवमीला शहाणे यांची रामाची सुंदर भजने झाली,

आहे तसेच दर हरताळकिला आनंद वनातल्या बायका पूजा करतात सुंदर वस्त्रे व आभूषणे घालून त्यांना पूजा करताना पाहून आनंद वाटतो,आजूबाजूच्या सोसायटीतल्या लोकांनी आपल्या देवाला आपले मानले आहे ते पाहून खूप आनंद होतो, गणपतीच्या भक्तांनी एक अथर्वशीर्ष मंडळ सुरू केले आहे,चतुरथीला हे भक्त अथर्वशीर्ष पाठ करतात त्यानंतर गणपतीची आरती करतात, आजकाल क्षदधा व लोकांना वेळ नसल्याने मंदिराची संख्या कमी आहे, तरी देवळासाठी श्री व सौ पानसे यांनी देवळाची संपूर्ण जबाबदारी घेतली आहे, श्री पानसे यांनी देवळाच्या नूतनीकरणाची संपूर्ण जबाबदारी घेतली आहे व कमलताई पानसे यांना मदत करीत आहेत, देवळाचे नूतनीकरण करावयाची तर त्यासाठी देणगी देणे आवश्यक आहे, गणेश साईभक्त आपापल्या इच्छेनुसार देणगी देणे, आजकालच्या महागाईच्या दिवसात आपले भरमसाठ खर्च वाढले तरी ज्याला जमेल त्याने थोडासा हातभार मंदिराच्या कामाला लावावा, ही जबरदस्ती नसून हे प्रेमाचे सांगणे आहे महागाईमुळे लोकांची दातृत्व शक्ती कमी झाली आहे पण आपल्या या आनंदवन रहिवाशांनी उभ्या केलेल्या वास्तूसाठी थोडासा हातभार लावाल अशी विनंती।

# पान खाये सैया हमारो

आम्ही पुण्याहून नाशिकला जाताना पंचवटीला जेवण घेऊन बाहेर पडलो, मुखशुद्धीसाठी पान खाण्याचे ठरविले आमच्या लहानपणी पान खाणारा माणूस म्हणजे रंगेल असे समजले जात असे,

विड्याच्या पानाचे आकार हृदयासारखे असते तसेच त्याला प्रेमाचे प्रतीक ही मानले जाते, घरगुती पानांमध्ये फक्त कथा चुना सुपारी बडीशेप आणि लवंग ते सुद्धा सणावाराच्या दिवशी पुरणपोळीच्या जेवणानंतर खायची पद्धत आहेच, पण आयुर्वेद म्हणते की पान म्हणजे औषधीयुक्त गोळीच त्रयोदशी गुणी वेडा त्यात पान चुना कथा सुपारी ज्येष्ठमध कंकुळा लवंग वेलची गुलकंद जायपत्री केशर खोबरे कीस हे सर्व पदार्थ,

पानाची संस्कृती भारतचीच नव्हेत तर पाकिस्तान थायलंड इंडोनेशिया श्रीलंका येथे पण आहे आपल्याकडे जयपूर मध्ये तर वर्क लावलेले पान मिळते,

लग्न पक्क करण्याच्या निधीमध्ये पान आवश्यक असते, एकमेकांना पान सुपारी देऊन मैत्रीचे नाते घट्ट केले जाते, खेडेगावात मुलाच्या जन्माची बातमी पानावर साखर देऊन सांगतात, मान्यवरांचे स्वागत म्हणजे नारळ व पान सुपारी देऊनच, भाऊबीजला बहीण पानावर करगोटा सुपारी व नारळ देऊन भाऊरायाला ओवाळते, राजा महाराजांच्या कडून मिळालेले पान म्हणजे मानाची व अभिमानाची बाब समजली जाते,

पाण्याच्या जाती तरी किती कलकत्ता कपुरी बनारसी भोपाळी मद्रासी मगई जंगनाती बंगला पान ,

नागपूरकडे नागवेळीच्या मळ्यात सर्पाची वस्ती असते त्यांची विषबाधा होऊ नये म्हणून पानवाला शेंडा व डेट कडून पान बनवतात,

जरीना चा कोठा असो किंवा जयश्री गडकर ची लावणी असो पानपुडा त्या मैफिलीची जाण व शान, अनेक सिनेमात पानाचा उल्लेख असतोच अमिताभ चा खाई के पान बनारस वाला,

माहूरच्या देवीला 101 पानांचा कूटलेला विडा अर्पण केला जातो, पानाचा विडा उचलून काम पूर्ण करण्याची शपथ घेण्याची परंपरा आहे,

बाजीराव च्या मस्तानीची त्वचा इतकी नितळ की पान खाऊन गळयातून उतरताना दिसत असे,

असे म्हणतात इतके पानपुराण वाचल्यानंतर हे पान ठेवल्यावरून सुंदर पानाचा विडा घेऊन पत्नीला खाऊ घाला व बघा तरी तिच्या गळयातून कसा उतरतो तो।

# गप्प गप्पा गप्पीष्ट

गप्प.. हाताची घडी तोंडावर बोट देवासारखे गप्प बसा गुरुजी मुलांना रागवत होते, देवासारखे गप्प ,देव का कधी गप्प बसतो गप्प राहून सगळ्या जगाची उलथा पालथ करतो तो ,आजही देवापुढे नाक घासावे लागणार खरेच देव जर बोलायला लागला तर भक्तांना आशीर्वाद व पापी लोकांना शाप देईल तो ,

असो ,विषय आहे गप्प बसण्याचा,शहाणी माणसे गप्प राहतात व मुर्खांची बडबड ऐकून घेतात, मूर्खांची भीती वाटत नाही पण गप्प बसलेल्या माणसांची भीती वाटते कारण त्यांच्या मनात काय चालले आहे हे कळत नाही,

काही वेळा गप्प बसल्याने खूप नुकसान होते पण काही वेळा लागट बोलण्याने माणसे दुखावली जातात शस्त्राची जखम बरी होते पण शब्दांची जखम बरी होत नाही,काही वेळा गप्प राहणे हिताचे ठरते,

बडबडी माणसे गप्प राहू शकत नाहीत कारण त्यांच्या गप्प राहण्याने जीव घाबरतो कधी कधी वाटते की आपण पशुपक्षी प्राणी यांच्यासारखे मुके असतो तर बरे झाले असते कारण कुत्रा मांजर यावर आपण जास्त प्रेम करतो कारण ती मुकी असतात,

गप्प बसणारी माणसे आतल्या गाठीचे असतात त्यांच्यापासून सावध राहावे लागते पण गप्पा मारणारी माणसे मनाने मोकळी असतात,

गपपा......गप्पा मारणे हा मनोरंजनाचा सर्वात चांगला प्रकार आहे सर्वांना गप्पा प्रिय असतात चार लोक एकत्र आले की गप्पांना सुरुवात होती,गप्पांमध्ये टीव्हीवरच्या बातम्या राजकीय घडामोडी सोसायटीचे विषय वाचलेले व ऐकलेले विनोद यांनचा समावेश असतो हे सर्व विषय प्रामुख्याने पुरुषांच्या गप्पांमध्ये असतात,

पण खरा आनंद गप्पांचा स्त्रियांना मिळतो कारण त्यांना गप्पांसाठी कुठलाही विषय चालतो कधीही चार बायका एकत्र आल्या की त्यांना विषय लागत नाही,

बायकांना गासेप करायला खूप आवडते सोसायटीत किंवा दुसऱ्यांच्या घरात काय चालले आहे ते समजले म्हणजे बरे वाटते, गासिपिंग करणे हा स्त्रियांचा जन्मसिद्ध हक्क आहे असे म्हणतात, एकूण पुरुष काय किंवा बायका काय गप्पांमध्ये रंगून जातात

आपले दुःख विवंचना टेन्शन विसरून जातात, बऱ्याच लोकांचे दुःख चव्हाट्यावर गप्पा मारून हलके होते शहरात कट्ट्यांवर खेडेगावात पारावर जाऊन गप्पा मारण्याची व्यवस्था असते, खेडेगावात गाव गप्पा म्हणजे त्यांचे वर्तमानपत्रच असते,

गप्पिष्ट ... गप्पीष्ट माणसांजवळ मोठ्या संख्येने लोक जमा होतात कारण कुठलीही गोष्ट रंगून खुलवून सांगण्याची त्यांची कला असते प्रत्यक्ष भूतकाळ किंवा भविष्यकाळ ते आपल्यासमोर उभा करतात शब्दांची मांडणी व ओधवती भाषा हे त्यांचे वैशिष्ट्य असते, अशा माणसांच्या सहवासात लोक खूप असतात त्यामुळे ज्ञान व मनोरंजन होते,

साठी नंतर मिळालेल्या बोनस आयुष्यात सगळ्यात जास्त गप्पा मारल्या जातात कारण भरपूर वेळ मिळतो व गप्पा मुळे आपले आजार विवंचना टेन्शन विसरले जाते

त्यामुळे जेव्हा वेळ मिळेल तेव्हा भरपूर गप्पा मारा व आनंदित रहा।

# शो मस्ट गो ऑन

मंदिरात आरती चालू होती मानेवर मुंगळा चढला होता हाताने झटकून खाली टाकून दिला पण आरती चं लक्ष लागेना ,मुंगळाचे काय झाले असेल त्याच्या पायाला फ्रॅक्चर तर झाले नसेल ना ,खाली पाहिले तर तो मुंगळा आपल्या  केसासारख्या पायाने भरा भरा चालत होता, मी पडले तर पायाचे ऑपरेशन करावे लागले वर्ष झाले तरी नीट चालता येत नव्हते, तेव्हापासून पायाचे किती महत्व आहे हे मी जाणत होते,

परमेश्वराने माणसाची शरीर रचना किती व्यवस्थित केली आहे ,दोन डोळ्यांनी पाहायचं दोन कानांनी ऐकायचं दोन नाकपुड्यांनी श्वास घ्यायचा दातांनी जेवण चावायचं नंतर अन्ननलिकेतून पोटामध्ये पचन होणार व त्यानंतर विसर्जन,

पोटाखाली जे पाय दिलेत ते खूपच उपयोगी आहेत, मनाला पाय नसतात तरी मन कुठेही जाऊ शकतं ,आणि प्राण्यांची मुळे जन्म झाल्याबरोबर टुणकण उडी मारून चालायला लागतात पण माणसांची मुले एक वर्षाने चालतात, दहा महिन्याची मुले जेव्हा प्रथम उभा राहतात तेव्हा सगळेजण किती खुश होतात, त्यांचा नंतर बोटाला धरून चालायला शिकवावे लागते, मग ही मुले बोट सोडून पळायला लागतात ,ती इतकी पळतात की अमेरिका ऑस्ट्रेलिया लंडन येथे जाऊन थांबतात,

मुलांचे पाय पाळण्यातच दिसतात या लटपट चालण्याने ठुमक चलत रामचंद्र या गाण्यांची निर्मिती झाली शरीरात पायाला एक विशिष्ट स्थान आहे, मुले आशीर्वाद घेण्यासाठी माता-पिता आजी आजोबा गुरुजन व वृद्ध माणसे यांच्या पायावर डोके ठेवतात, देवाच्या पायावर माणसे मस्तक टेकवतात,

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले,एखाद्या माणसाचा राग आला तर त्याला लाथ मारायला याच पायांचा उपयोग होतो, एखाद्या स्त्रीचे नैतिक आचरण खराब झाले तर तिचा पाय घसरला असे म्हटले जाते,

तसेच एखाद्या स्त्रीला दिवस राहिले तर तिचे पाय भारी आहेत असे म्हटले जाते, जीवावर घेतलं तर जीव वाचविण्यासाठी माणसे पळून जातात ,संस्कृत मध्ये म्हण आहे य फलायते सजीवती,

पूर्वी मुलगी पाहायला गेले तर मुलीला चालून दाखव असे सांगायचे व तिचे पाय सपाट तर नाहीत ना ते पाहायचे मुलीच्या चालण्यावरून ती मुलगी कशी आहे ते ओळखायचे, लचकत मुरडत चालण्यावरून मुलींच्या आचरणाची शंका घेतली जायची सुनेच्या पायाने लक्ष्मी घरात येते असे म्हणतात ,

पायी चालण्याला खूप महत्त्व आहे डॉक्टर पायी चालण्याचा सल्ला देतात, आजकालचे पार्क सर्व पायी चालणाऱ्यांनी फुल असतात,

मोठ्या मोठ्या लोकांनी पायी चालण्यावर भर दिला आहे, राम सीता लक्ष्मण 14 वर्षे पायी फिरत होते तसेच पांडवांनाही बारा वर्षे पायी चालण्याचा वनवास भोगला, मीराबाई गल्ली गल्ली मध्ये भजने म्हणत पायी फिरत होती, समर्थ रामदासांनी ही बारा वर्षे पायी फिरून तपश्चर्या केली, गोरा कुंभार पायाने चिखल तुडवत विठ्ठलाची भक्ती करत होता, भूदानसाठी विनोबा भावे पायी फिरत होते, गांधीजींनी दांडी यात्रा पायी चालूनच केली, दरवर्षी हजारो पावले दिंडी बरोबर पंढरपूरला जातात प्राणी किडे मुंग्या सर्व पायानेच चालत असतात,

बदलत्या काळाच्या पावलांबरोबर आपणही आपले पाऊल उचलले पाहिजे ,पूर्वी लोक शतपावली करत असे त्यामुळे प्रकृती उत्तम राहत असे, एकूण महत्त्वाचे सांगायचे हेच आहे की सर्वांनी चालत राहिले पाहिजे, डायबेटिसच्या रोग्यांनी खूप चालले पाहिजे व पायालाही खूप जपले पाहिजे, गँगरीन झाला तर पाय कापावा लागतो , सुखाचे किंवा दुःखाचे कुठलेही दिवस थांबत नाही तेव्हा परमेश्वराने असे आयुष्य दिले आहे त्यांच्याबरोबर चालत राहिले पाहिजे, जन्माला येताना माणूस पाय घेऊन येतो व जातानाही आपले पाय बरोबर नेतो, तेव्हा माणसाने चालत राहिले पाहिजे, चालतच राहिले पाहिजे, राज कपूर ने म्हटले आहे ना शो मस्ट गो ऑन।

# फुकटे मेले

परवा देवळात आरती संपल्यानंतर आम्ही बायका गप्पा मारत बसलो होतो पण इतके डस त्रास देत होते एक तर स्मरणिकेत काय लिहावे कळत नव्हते सुचत नव्हते,

म्हणून मन उदास होते आणि त्यातून या डासांचा त्रास नकळत मन डासांचा विचार करू लागले अन लिखाणाच्या विषय सुचला ,

या डासांलाच पहा ना यांना रेडीमेड रक्ताची चटक लागली आहे वेगवेगळया व्यक्तींना चावून ते आपली उपजीविका करतात ,सगळ्या माणसांचे ब्लड ग्रुप वेगळे असतात डासांच्या पोटात त्याचे कॉकटेल बनत असेल आणि बहाद्दर ते पचवतात ही, रिप्लेसमेंट ची वगैरे जरुरत नाही एकदम तयार रक्तावर त्यांची धाड असते व यांना कोणाच्या रक्ताची एलर्जी येत नाही,

डासांना चआयव्ही झालेलं कोणी ऐकले का? दिसायला छोटा असलेला हा जीव मोठा रसिक असतो एवढ्याशा डासाचे डोळे किती तीक्ष्ण बरोबर माणसाच्या कान शोधून गुण गुण कानाजवळ करत असतात, छुपमछूपाई खेळण्यात तर ते इतके तरबेज असतात आपण कितीही दारे खिडक्या बंद करून बसलो तरी ते रात्री आपण झोपलेलो की पलंगा खालून सोफया खालून वरती छताला चिटकलेले निघून आपल्याला त्रास देतात ,सकाळी उठले की चित्र विचित्र चेहरे बनलेले असतात,

आम्ही परवा अलीगडला लग्नाला गेलो होतो तेव्हा त्यांच्या मोठ्या सुनेला विचारले की अलिगड ला काय प्रसिद्ध आहे ती म्हणाली तिथले थ्री एम प्रसिद्ध आहेत मच्छर

मक्खी मुसलमान, बघा एवढ्याशा छोट्या जीवाने गावाला प्रसिद्धी मिळवून दिली पूर्वी डासामुळे फक्त मलेरिया व्हायचा सहा सहा महिने थंडी वाजून ताप भरायचा कोईनाईन हेच फक्त औषध होते आता होतो डेंगू आणि चिकनगुनिया ,काय नाव आहे माझ्या चुलत सासूबाईंना चिकनगुनिया झाला, त्या म्हणत होत्या अहो कधी आयुष्यात चिकन मटण खाल्ले नाही गळयात तुळशीची माळ आहे तरी या चिकन गुन्ह्याने माझे हाड बाटले,

तुम्ही गुड नाईट लावा तूप लावा पण तुमची नाईट कधीच गुड होऊ शकत नाही, परवा आमच्याकडे आलेल्या पाहुण्यांना कौतुकाने विचारले कसे वाटले आमचे आनंदवन ते म्हणाले आनंदवन ठीक आहे पण या डासांनी रात्री मला फोडून काढले अर्थातच त्यांनी आपला गाषा रात्रीची वाट न पाहताच गुंडाळला, मी जे करू शकले नाही ते डासांनी केले ,

लहान मुलांना खेळता येत नाही, मोठ्या माणसांना गप्पा मारता येत नाही, रात्रीची झोप नीट मिळत नाही सगळे या शूद्र डासामुळे होते, या उपद्रवी कीटकांची उत्पत्ती करून परमेश्वराने आपल्यावर सूड उगवला आहे,

डासांचा काहीही उपयोग नाही सिनेमात मोठे मोठे डाकू गरीब व दुबळ्या जनतेला मच्छर म्हणून हिनव्हतात पण एकदा त्यांच्यावर मच्छर सोडले पाहिजेत म्हणजे कळेल त्यांना,

डासांची संख्या कमी करण्यासाठी महाराष्ट्रात एक दिवस कोरडा म्हणून पाळला जातो आठवड्यातून एकदा सर्व भांडी वगैरे कोरडी करून ठेवतात अनेक उपाय केले तरी डासांच्या संखयेतं वाढच होत राहते,अशा या भयंकर किटकाला तुम्ही शूद्र मच्छर म्हणून हिणवू नका, मोठे मोठे यांना शरण गेले आहेत ,

लिहिण्यासारखे खूप आहे पण स्मरणीकेची मर्यादा व या आयत्यावेळी सुसलेला विषय आहे याच्यावर प्रबंध लिहून अभ्यास करायला हवा, तुम्हाला बोरकरणीच तोपर्यंत टाटा,

अन्न न खाता व पैसे न कमावता तयार रक्त पितात म्हणून फुकटे मेले

# झोपेत जागले मी

घराचे कुलूप काढत होते तोच आतून फोन खणखणल्याचा आवाज आला घाई घाईने दार उघडून फोन घेतला मैत्रिणीचा होता ,उद्या मुंबईतून निघून परवा दिल्लीला येते म्हणाली तिला राष्ट्रपतींकडून बेस्ट टीचर अवार्ड मिळणार होते अर्थात मला खूपच आनंद झाला दोन-तीन दिवस राहून अवार्ड घेऊन परत जाताना ती म्हणाली ,अगं तुझं हे काय चाललं आहे चार खोल्या आवरल्या चार रेटे थापली म्हणजे लॉनवर बसायला मोकळी ,अंग काहीतरी कर, प्रत्येक गोष्ट डीप मध्ये जाऊन करायची तुझी सवय कुठे गेली तुझ्या एवढं काम तर आम्ही नोकरी करून सुद्धा करतो बाईसाहेब लेक्चर देऊन गेल्या ,

आईकून घेणारा कोणी मिळाला तर टीचर लोकांना स्वयं असते लेक्चर देण्याची त्यातून ही बेस्ट टीचर ,पण मलाही आता काहीतरी करावसं वाटायला लागलं, कविता करावी का, जे ना बघे रवी ते बघे कवी, सूर्याला काय काय दिसत नसावे ते पाहायला मी बाहेर गेले, बागेत दोन-तीन गुलाबाची फुलं उमळली होती रवीला गुलाब दिसत असावेत पण काटे दिसत नसावेत म्हणून गुलाब फेकून काटे घरात आणले,काटा समोर ठेवला खर पण काहीच सुचेना, मग लक्षात आले की घर फारच व्यवस्थित आहे कवी म्हणजे अव्यवस्थित म्हणून खोलीत पसारा घातला थोडेसे केस विस्कटले समोर कॅलेंडरवर बकास नजर लावली , तोंडाने गुणगुणू लागले चेहरा हसरा घालूनी मन सोवल पसारा गाव माझे सातारा,

चौथी ओळ मात्र काही केल्या सुचेच ना कॅलेंडर वरचे वाणी धोबी दूध पेपर या सगळ्यांचे हिशोब दिसू लागले मध्येच हे स्केल दाखवून म्हणाले पुढचा माझ्याजवळच आहे उतारा, ती उगारलेली स्केल बघून यांना नाश्ता देण्याची आठवण झाली पोहे खाताना हे म्हणाले तुझ्या आईने पोह्याशिवाय दुसरं काही शिकवलं नाही वाटतं,

माझी आई स्वर्गात गेल्या आता पंधरा वर्षे झाली ,सासूचा उद्धार करायला हे चुकत नाही उगीच नाही जाव्याला धावा ग्रह म्हणतात, मी काट्यावर कविता करण्याच्या

मूडमध्ये होते म्हणून फारसं लक्ष दिलं नाही, हे गेल्याबरोबर मी काटा समोर ठेवला आणि खरंच कविता सफरू लागली ,

काटा ओ काटा लवकर बोल फाटा देईन नाहीतर चाटा मग मिळेल फाटा दाखवीन तुला बाटा बाहेर बारा वाटा,

पण हे काव्य की बडबड गीत मग काटा बाहेर फेकून दिला एक कप कडक कॉफी घेतली तरी स्फूर्ती रुसलेलीच, तेवढ्यात ड्रायक्लीनिंगच्या कपड्यांची आठवण आली नाही तर साहेब दुसऱ्यांदा स्केल दाखवायचे ,

रिक्षात बसले ना विचार केला रवीला रिक्षावाला दिसत असेल तर त्याचा घाम दिसत नसेल तेव्हा रिक्षावाल्यावरच कविता लिहावी,

रिक्षा ओढते रिक्षा मागत नाही भिक्षा कष्ट करण्याची दीक्षा,

एवढ्यात ड्रायक्लिनची रिसीट हरवल्याचं लक्षात आले झालं मग चौथी ओळ राहूनच गेली ,बिना रिसीट चे कपडे ओळखून शोधून आणले येताना रिक्षावालाच्या रेडिओ गात होता राधा काभी शाम तो मीरा का भी श्याम, हा श्याम होता तरी कुणाकुणाचा ? मीरेचा राधेचा आणि सोळा सहस्त्रनारींचा ,नव्हता फक्त रुक्मणी व सत्यभामेचा,

एकदा चांगलं महिनाभर मथुरा वृंदावनला राहून या श्यामच्या सगळ्या भानगडी शोधायला पाहिजेत बापरे देवाबद्दल असले विचार चांगलेच घाबरले व देवासमोर अकरा वेळा नाक घासले,

एकूण काय सगळ्या दिवस फुकट गेला तरी चार ओळी काही लिहून झाल्या नाहीत सहज घड्याळाकडे लक्ष गेले ,यांचा फक्त मला दचकवण्याचा काम,

,स्वयंपाकाचा पत्ता नव्हता भराभरा पिठलं भात करायला घेतला पिठलं भात म्हणजे यांचं वीक पॉईंट, म्हटलं पिठलं भातावरच कविता करूया का आणि भराभरा ओळी सुचू लागल्या,

रोज खाल्लं पिठलं तरी मन नाही विटलं, पिठल्याचा पिवळ रंग डायटिंग करतो भंग, बासमतीचा शुभ्र भात, तेवढ्यात त्यांच्या बुटाचा आवाज ऐकला आणि कवितेला झाला घात, भराभरा पान घेतली पांढरा शुभ्र भात त्याच्यावर साजूक तुपाची धार अन वर सोन्यासारखं सुंदर पिठलं ,हे आणि मुलं जेवत होती त्यांच्या तोंडावरचे समाधान पाहून अगदी मनाच्या आतून कविता सुचली, नको रवी नको कवी नको काटे नको फुल स्वयंपाक घर आपले हक्काचे सुंदर ही चूल अनमोल।

# असे हे क्रूर

पोह्याची बशी व वाफाळलेला चहा घेऊन नाश्त्यासाठी बसले तेवढ्यात बेल वाजली पोहे व चहा झाकून चरफडत उठले व दार उघडले , करोल बागेतून कालिंदी वहिनी आल्या होत्या चहा पोहे खाणं संपल्यावर त्या स्वयंपाक घराकडे बघत म्हणाल्या आज संडे तेव्हा संडे स्पेशल शिस्ते वाटतं मी म्हणाले आज पनीर मसाला बनतोय माझ्याकडे अविश्वासाने पाहत म्हणाल्या वहिनी तुम्ही शाकाहारी की मांसाहारी, मला कसे कसे झाले एक ठोका चुकला खरे सांगावे की खोटे म्हणाले लहानपणी तसे माझे हाड बाटले हो परंतु सध्या डॉक्टरांच्या सल्ल्यामुळे सगळे सोडून दिले ,त्या म्हणाल्या किती हो क्रूर असता तुम्ही मांसाहारी, त्या गेल्या पण त्यांचे शब्द मला जीवहारी लागले ,आपल्या घरात झुरळ पाळी उंदीर डास माशा यांना आपण मारतोस ना आपण सगळेच थोड्याफार प्रमाणात क्रूर असतो ,देवाऱ्यावर साप चढला तर त्याला पायातल्या वहानेने मारावा असे तुकाराम महाराजांनी सांगितले आहे तेव्हा त्यांनाही आपण क्रूर म्हणू का ? जगातले निम्म्याहून अधिक लोक माणस आहार करतात,

पूर्वीचे ऋषी मनी यज्ञात प्राण्यांना मारून त्यांचे मास भाजून प्रसाद म्हणून खात होते, प्रसिद्ध तत्वज्ञानी सिग्मंड फ्राईड च्या सिद्धांतच आहे की एक जीव दुसऱ्या जीवावर अवलंबून असतो, छोट्या माशाला मोठा मासा, मोठ्या मासाला देव मासा ,देव मासाला शार्क मासा गिळतो ,प्राइड सांगितले की जीभ दिवस जीवयती ,

गुजरात मध्ये दुष्काळ पडला तेव्हा अहिंसावादी गांधीजीने मासे मारून खा असे सांगितले, जे अभक्ष खातात ते स्वतः प्राण्यांना मारत नाही मारणारा खाटीक दुसराच असतो तेव्हा त्यांना क्रूर म्हणणे योग्य नाही, अभक्ष खाण्यामुळे किती डाळ भाजी वाचते ती वेगळीच,

हा लेख लिहिताना मला अशोक नायगावकर यांची कविता आठवली त्यांनी दाखवून दिले किती क्रूर असतात हे शाकाहारी ,आता गृहणी कसा स्वयंपाक करतात हे पहा, मी शेजारी सुद्धा ताईकडे गेले त्या कोबी वेळीवर खसाखसा चिरत होत्या ,शेजारी अभ्यंकर वहिनी काकडी जोरजोरात किसत होत्या , वर कमल ताईंची नेहा काकडी चोचवत

होती ,सुनंदाताई कोयत्याने फोडलेल्या कैऱ्यांवर मसाला लावत होत्या ,त्यांच्यावरची मनीषा उकळत्या तुपात जिलब्या तळत होती,इकडे दलाल वहिनी बेरड्यासाठी दनादन नारळ फोडत होत्या, तिकडे तेरा नंबरची काकू गरम तव्यावर थालीपीठ भाजत होती, मुंजे वहिनी खलबत्त्यात जोरात चटणी कुठत होत्या, इकडे वर गवांडे वहिनी गॅसवर वांगे बाजत होत्या, विनोदीनि कलिंगड व खरबुजाचे सुरीने तुकडे करत होती,समोरची प्रमोदिनी पपईच्या पोटात डायरेक्ट सुरी खुपसत होती व ओवन मध्ये केक बिस्कीट भाजत होती, बाकींच्याकडे वेळ अभावी जाऊ शकले नाही, पण त्याही पदार्थांवर अत्याचार करत असतीलच, चिरणे किसने भाजणे दळणे वाटणे कुटणे तळणे कापणे या गोष्टी थोड्याफार क्रूर नाहीत का ,म्हणजे एकूण काय कोणीही कोणालाही नावे ठेवू नयेत एवढंच, समस्त वहिनींची क्षमा मागून,

आत्ताच आमच्या मनीला सहा पिल्ले झाली त्यातले एक पिल्लू तिने चटकन खाऊन घेतले आता तिला काय म्हणायचे, तसेच कोकिळा आपली अंडी कावळीच्या घरट्यात ठेवते तिला काय म्हणायचे ते तुम्हीच ठरवा।

# आपला हात जगन्नाथ

सकाळी शेजारच्या दादांच्या स्त्रोतांनी जाग आली ,किती भाग्यवान आपण रोज देवाचे नाव कानावर पडून जाग येते ,नेहमीच्या सवयआणि हाताची ओंजळ करून कराग्रे

वसते लक्ष्मी म्हटलं अन मनात विचार आला की आपल्या हातात लक्ष्मीचा वास असतो म्हणतो म्हणजेच या हाताचे खूप महत्त्व असले पाहिजे,

घरात पाहुणे होते मुलाला म्हटले आज पाहुण्यांबरोबर जेवूनच बाहेर पडणार न्याहारी कटाप, मुलगा चटकन म्हणाला हात तिच्या एवढेच ना ,चहा पाणी संपते तोवर

मुलाचा मित्र आला मनाला पापा मेरे लिये शीला का हात मागणे गये है, इतक्या लहान वयात याचे दोनाचे चार हात होणार तर त्याला म्हटले आता जेवूनच जा ,हात

सरशी चार पोळ्या अजून होतील ,पाहुणे म्हणाले तुमच्या हाताचं पिठलं खायचे ,पाहुण्यांच्या बायकोचे हात तर लक्ष्मीची हात आहेत अगदी चकचकीत घर,

मी म्हणाले तुमची निरा तर सुगरण आहे 25 माणसांचा स्वयंपाक म्हणजे नीराच्या हाताचा मळ आणि हाताला चव तरी किती ,

पिठल्यासाठी मोळकर्णीला कोथिंबीर आणायला पाठवले होते पण ती हात हलवतच परत आली व मला दोनशे रुपये उसने मागू लागली , मनाली बाई माझी कमावती मुलगी शेजारच्या मुलाचा हात धरून पळून गेली आमचं हातावरच पोट त्या मुलाला दोन्ही हात एकमेकांवर चोळून तळताळात देऊ लागली ,बाई नवरा हातावर हात धरून बसलाय, म्हातारी हाताने डोकं बडवत बसलीये तर मला ताबडतोब पैसे द्या, पाहुण्यांना सुप्रीम कोर्टात जायचे होते तिकडे निघालो, रस्त्यावर येतात हाताने रिक्षा थांबावली रिक्षावाल्यांच्या रेडिओ वाजत होता ,हातो मे तेरे मेरा हाथ रहे, ऐकता ऐकता मनात विचार आला आज हातच आपला पाठलाग करत आहेत,

डोळ्यासमोर साईबाबा कृष्ण विष्णू नानक आयुर्विमा व मुख्य म्हणजे कॉंग्रेसचा हात दिसत होता, हातानेच आपण लेख कविता लिहितो,कोर्टात गेल्याबरोबर आपटे वकिलांना भेटलो ते पाहुण्यांना म्हणाले तुमची केस नीट हाताळली पण पुरावा हातातून निसटल्यामुळे केस हाताबाहेर गेली , प्रतिपक्षाचे हात वरपर्यंत पोहोचले आहेत आता

आपल्या हातात काही राहिलं नाही ,माझे हात बांधले गेलेत बघू प्रयत्न करून कायद्याचे हात लांब असतात, हे एकूण आम्ही सर्व हतबल झालो मी निराच्या पाठीवर हात ठेवला काय बोलणार समोरून कानडे वकील येत होते कुणाला तरी सांगत होते की दोन्ही वकिलांनी हात मिळवल्यामुळे कुलकर्णी हरले, मी मीरा कडे पाहिले व हाताची ओंजळ करून तिच्यासाठी दुवा मागितली ,

कोर्टाच्या बाहेर पडलो एक भिकारी हात उभारून मुलाच्या मागे धावत होती, झाडाखाली बसलेल्या ज्योतिषाला एक म्हातारा हात दाखवत होता, मनात विचार आला आता याचे काय भविष्य उरले असेल, तुळपुळे वकील आपला दावा उजवा हात घेऊन कोर्टात प्रवेश करत होते मीरा खूपच निराश दिसत होती मला म्हणाली, केस जिंकली तर मुलांपुढे पैशासाठी हात पसरावे लागणार नाही ,यांनी तर आता कंटाळून हात टेकले आहेत कोणीतरी मागे बडबडत होते की हम तो भैया हात धो बैठे, प्रतिस्पर्धीने अच्छा हात दिखाया,

मीरा चांगलेच रकुंडीला आली कारण प्रसंग येतात सगळ्या नातेवाईकांनी हात झटकले, तरी पवारांचा हात मोठा आहे त्यांनी पुष्कळ मदत केली समोर बस उभी होती पटकन बस मध्ये चढलो बस मध्ये कोणाचे तरी पाकीट मारले गेले म्हणून त्या माणसाने बस पोलीस चौकीत न्यायला लावली, चोराने हातोहात पर्स पुढे पाठवली असणार कारण त्यात बरेच पैसे होते, तरी ज्याच्यावर सनशय होता त्याला पोलिसांनी पकडले, पोलीस इन्स्पेक्टर म्हणत होता आता माझे दोन हात पडले की कबूल होईल, दोघेजण त्याला खूप मारू लागले म्हणतात ना चार हात तर वैऱ्यावर पण पडू नयेत, त्याला तिथेच सोडून बस करोलबागेत आली,

मीराचा मूड ठीक करण्यासाठी करोल बागेत उतरलो,करोल बागेत बाजार करताना एक दुकानसमोर एक भिकारी बसला होता त्याला खांदा पासून दोन्ही हात नव्हते मनात विचार आला याचे हाताशिवाय कसे होत असेल,कारण आपण हातानेच जेवतो सगळी काम हातानेच करतो,

संध्याकाळ झाल्यामुळे आठ वाजता आनंदवनात परतलो बाहेर खाऊन आल्यामुळे व खूप थकल्यामुळे झोपायची तयारी केली, झोपताना देवाला दोन्ही हात जोडून नमस्कार केला व म्हणाले देवा आजचा दिवस बरा गेला उद्याचाही असाच जाऊ दे, शेवटी म्हणाले आपला हात जगन्नाथ।

# बांधले आडाखे मिळाले तडाखे

जीवनात आपण काही आडाखे बांधतो पण त्याचे कधी चांगले कधी वाईट कधी हास्यास्पद परिणाम आपल्या भोगावे लागतात ,सहाव्या वर्षी शाळेत जायला

लागल्यापासून दोन-तीन महिने झाले होते संध्याकाळी बाहेर अंगणात खेळत असताना कुणीतरी बातमी आणली गांधीजींचा खून झाला आता एक महिना शाळा बंद,

शाळा बंद म्हणून ऐकल्यावर मला इतका आनंद झाला की मी नाचत नाचत घरात गेले समोरून दादा येताना दिसला त्याला ओरडून सांगितले दादा दादा एक महिना

शाळा बंद बर झाले गांधीजींचा खून झाला, पण दादांनी अशी खाडकून माझ्या मुस्काटात दिली की दिवस असून सुद्धा डोळ्यापुढे काजवे चमकले,मी आडाखा बांधला होता की दादालाही खूप आनंद होईल पण तो अजिबात चुकला,

मी तेव्हा आठ वर्षाची होते तेव्हा सुद्धा आजच्या सारखीच स्मार्ट होते, गावाहून आलेल्या पाहुणीला संभाजी बाग दाखवायला न्यायला आईने मला सांगितले मी तिला

बागेत घेऊन गेली, पाहुणेही नवधर नुकतीच साडी नेसायला लागलेली स्वतःला सुंदर समजणारी बागेत फिरता फिरता पाहुणे एकदम मला म्हणाली अगं बघ बघ मेल्याने

गप्पकन मला डोळा घातली की, मला काहीच समजायचे नाही वयाच्या आठव्या वर्षी या डोळयांच्या भानगडी घालने मारणे वगैरे समजत नाही पण हे महत्त्वाचे काहीतरी घडले एवढे मात्र कळले आणि हेही कळले की आता घरी पाहुणीला मोठेपणा मिळणार, म्हणून मी पळत पळत घरी जाऊन कुणी काही बोलायच्या आत मोठ्या उत्साहाने आईला हे सांगितले , आई मुलाने गपकन डोळा घातला माझे वाक्य पुरे व्हायच्या आत आईने माझ्या पाठीत धपाटा घातला माझे दोन्ही हात पकडून आईने मला बडव बडव बडवले आणि बाथरूम मध्ये बंद केले, कोणी डोळा घातला पाहुणीला आणि आईचे धपाटे मात्र बसले मला,

आमचे हे त्यावेळी इंजिनिअरिंग कॉलेज मध्ये होते त्यावेळी ते हे नव्हते आणि आमचेही नव्हते ,आमचे मोठे घर बघून खोली भाड्याने मागायला आले, मी त्यावेळी बाहेरच होते आत येऊन मी वहिनीला म्हणाले बाहेर एक मुलगा खोली मागायला

आलाय, वहिनी त्यावेळी धोब्याशी जोरात भांडत होती, तिने वड्याचे तेल वांग्यावर काढले ,ती रागारागाने त्यांना म्हणाली जा ना बाबा पोरीबाळींचे घर आणि आलाय मोठा जागा मागायला. पुढे यांचे माझ्याशी लग्न झाल्यावर हे वहिनीला म्हणाले, वहिनी जागा दिलीत नाहीत पण पोरगी दिलीच जोरदार तडाखा बसला वहिनीला,

सकाळी साडेआठची वेळ होती मी झोपलेली होते दारावरची बेल वाजली, मी चढ-फळत उठले आणि दार उघडले समोर एक अनोळखीग्रस्त उभे होते त्यांनी विचारले

अप्पा आहेत का मी परत पहिल्यापासून झोपायच्या मूडमध्ये होते, मी त्या ग्रस्तांना म्हणाले आमच्याकडे सगळे झोपलेले आहेत आम्ही सूर्यवंशी आहोत, पाहुणे घरात येऊन बसले मीही आत गेले थोड्यावेळाने समजले की पाहुणे मला पाहायला आले होते ,मी अडाखा बांधला की ते कशाला असली सकाळी साडेआठ पर्यंत झोपणारी मुलगी सून म्हणून पसंत करतायेत, पण काय नवल त्यांना माझे म्हणे माझं सरळपणा भोळेपणा आवडला ,माझा अडाखा चुकला आणि गोड तडाका बसला ,

वनसांच्या मैत्रीणीच्या घरी कोणीतरी बसलो होते, त्या तिच्याकडे जायला निघाल्या, त्या मला म्हणाल्या वहिनी तुम्ही ही चला माझ्याबरोबर मला बाई सुचत नाही काय

बोलावे ते , तुम्हीच बोलाल, मी त्यांच्याबरोबर गेले त्यांच्या मैत्रिणीची आई बरेच दिवस आजारी होती मी आडाखा बांधला ही तिची आई गेली असणार ,तेथे गेल्यावर मी वनसांच्या मैत्रिणीला मातेचे महत्त्व खूप पटवून दिले स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी आईच्या डोळ्यात जर अश्रू पाहिलं तर हे राज्य तुणकत वाटेल , नेपोलियन शिवाजीला घडवणारी जिजामाता वगैरे वगैरे माझ्या प्रत्येक वाक्याला वन्स चिमटे घेत होत्या, मला वाटलं त्या मला उत्तेजन देत आहेत घरातले सगळेजण माझ्याकडे विचित्र नजरेने पाहत होते आम्ही सांत्वन संपून घराबाहेर पडलो, मात्र वनस एकदम म्हणाल्या काय हे वहिनी तिची आई जिवंत आहे वडील वारले आहेत तिचे, माझे तोंड कुठे लपवावे असे मला झाले, माझा अडाका साफ चुकला आणि तडाका असा बसला की मी अजून वनसांच्या त्या मैत्रिणीच्या घरावरून जात नाही,

एकदा आमच्या गावाकडे 85 वर्षाचे वृद्ध आजोबा यांना भेटायला आले, हे म्हणाले खायला कर काहीतरी मी उपमा बनवला व आजोबांना दिला, आजोबा म्हणाले उपमा

मला चालणार नाही मला अल्सर आहे, मी त्यांना म्हणाले मला वाटले की तुम्हाला डायबिटीस असेल गोड चालणार नाही म्हणून तिखट केला, हे रागाने बायकोचा

आघावपणा पहात होते, मग मी गोड शिरा केला गोड बरोबर उपमा चवीला खाऊन पाहुणे तृप्त झाले, हेच अडाखा न बांधता त्यांना विचारून केले असते तर,

आम्ही राजेंद्र नगरला राहत होतो तेव्हाची गोष्ट पुण्याहून फोन आला की जनकपुरीचे मामा मामी मुलीला बघायला येतील, दुसऱ्या दिवशी मी कामवालीच्या मदतीने सर्व घर स्वच्छ केले, पडदे बेडकवर बदलले धुतलेले टेबल कलाथ घातले चार डेकोरेशनचे पिसेस इकडचे तिकडे केले दोन गोड दोन तिखट पदार्थ बनवले, सगळे मनाप्रमाणे झाल्यावर सुंदर खादीची साडी नेसून तयार झाले, मुलीला सगळ्यात सुंदर ड्रेस घालायला लावला , बेल वाचताच सुहास्यमुद्रणे दार उघडले ओळख अजिबात

नव्हती मुलाकडचे पाहुणे असल्याने विनयाने व जपून जपून बोलत होते, त्यांनी मुलीला जवळ बोलून बरीच चौकशी केली जेवढे जास्तीच जास्त इम्प्रेशन भारतात येतील

तेवढे करून पाहुण्यांना आग्रह करून भरपूर खाऊ घातले ,घर पाहून पाहुणे अगदी खुश झाले पाहुण्यांना पोचवून आल्यावर खोल विश्वास टाकला, कालपासून टेन्शन होते ना

मुलीने व मी नवे कपडे बदलून जुने धुवत कपडे घातले ,बराबर पडदे बेडक्वर टेबल कलाथ काढून जुने घातले, खाण्याच्या प्लेट्स तशाच पडू दिल्या, पेपर वाचायला

घेतला आणि विस्कटून टाकला घर पूर्ववत केले, सोफ्यावर पडून अर्धी राहिलेली कादंबरी वाचायला घेतली, तेवढ्यात बेल वाजली कपाळावर अट्या घालत दार उघडले,

